शनिवार । ७ मार्च १९८१ । एक रुपया

# माणूस

## म्हैसाळ येथील दलित स्वावलंबन प्रयोगाने काय साधले?

सांगली येथे झालेल्या
या परिसंवादास
सर्व थरातील प्रमुख लोक,
प्राध्यापकवर्ग, वकील व
दलित समाजातील तरुणवर्ग
मोठ्या संख्येने उपस्थित होता.

पृष्ठ....९

## दिल्ली !

**हजार वर्षे येथे राहणाऱ्या माणसांनी साऱ्या भारतावर राज्य केलंय. दावत द्यावी आणि घ्यावी. इश्क करावा आणि उधळावा. वाणीवर मिठ्ठास भरावी. बेदरकारपणे पाठीत खंजीर खुपसावे. दूरवरून येणाऱ्या वादळांचा नुसता वासावरून अंदाज बांधावा आणि त्या वादळांना पुडीत बांधून खिशात घालण्याच्या हिकमती मनात बाळगत आणखी एखादी दावत द्यावी वा घ्यावी............**

## १४ फेब्रुवारी....कोणते वादळ ?

पृष्ठ....१४

# ‘ विवेक ’ बंद पडला . . .

विचारप्रधान साप्ताहिक चालवणे हे आजच्या काळात तसे एक दिव्यच आहे. मराठीत अशी साप्ताहिके जेमतेम एका हाताच्या बोटांवर मोजली तरी १।२ बोटे शिल्लकच उरतील. त्यापैकी पुण्याचे ‘ साधना ’ साप्ताहिक एक. या साप्ताहिकाच्या आर्थिक स्थितीविषयी नवे संपादक श्री. ना. ग. गोरे यांच्या सहीचे एक निवेदन नुकतेच साधनेच्या पहिल्या पानावर प्रसिद्ध झाले आहे. ( २१ फेब्रुवारी ८१) साधना सुरू होऊन बत्तीस वर्षांचा काळ उलटला. साने गुरुजींची पुण्याई असली आणि समाजवादी वर्तुळांचा पाठिंबा लाभला तरी हे साप्ताहिक आर्थिकदृष्टया अद्याप सुदृढ नाही ही वस्तुस्थिती आहे. मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या ‘ दिनाक ’ची स्थितीही तशी मजबूत नाही. तोटा सहन करण्यापलीकडे असल्यामुळे हे साप्ताहिक बंद करावे लागणार अशा वार्ता सबंधित वर्तुळातून अधूनमधून येत असतात. अशा कुठल्याही वार्ता येत नसता, मुंबईहूनच प्रसिद्ध होणारे संघाचे ‘ विवेक ’ हे साप्ताहिक अचानक व काहीही पूर्वकल्पना न देता बंदच करण्यात आले ! महाराष्ट्र हा आपण बुद्धिप्रधान, बुद्धिवादी प्रांत वगैरे म्हणत असतो; पण पुस्तकांचा खप पाहिला आणि विचारप्रधान साप्ताहिकांची ही अवस्था पाहिली की, हे म्हणणे किती फोल व पोकळ आहे हे ध्यानात येते. दर्जेदार व विचारप्रधान पुस्तकाची आवृत्ती, येथे जेमतेम हजार। पंधराशे प्रतीची निघते व ही खपायलाही सहज पाच। सात वर्षे लागतात. हीच रडकथा साप्ताहिकांच्या बाबतीत. महाराष्ट्रात समाजवादाचा पाळणा प्रथम हलणार असे भाषणात कोणी कितीही म्हणोत. समाजवादी पक्षाचे अ. भा. नेते महाराष्ट्रीय असोत. पण येथे समाजवादी विचारांची बांधिलकी पत्करणारी साधना, दिनाकसारखी साप्ताहिके काही धडपणे चालू शकत नाहीत. संघाची माणसे तशी चिकाटीची. सहसा हाती घेतलेले काम अर्धवट न सोडणारी; पण त्यानाही ‘ विवेक ’ बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागला हे विशेष चिंतनीय आहे. विवेक साप्ताहिकाची गरज संपली अशी काही स्थिती नाही. संघाचे कार्य सर्व क्षेत्रांत वाढते आहे. या कार्याला, त्यामागील विचारसूत्राला प्रसिद्धीची आवश्यकताही आहे. हे सर्व काम तरुण भारतसारखे एखादे दैनिक किती करू शकणार ? जाहिरातीशिवाय बऱ्याचशा दैनिकांत आजकाल वाचायचे असे काही शिल्लकच उरत नसते. विचारप्रसाराचे साधन म्हणून दैनिके कितपत उपयोगी आहेत याची एकदा पाहणी व्हायला हवी. अशा स्थितीत ‘ विवेक ’ साप्ताहिकाची गरज संपली असे कसे म्हणता येईल ? आणीबाणीच्या कठिण व कसोटीच्या काळात विवेक नुमता चालू राहिला असे नाही, तर या साप्ताहिकाने अन्यायाचा प्रतिकारही केला. दडपशाहीसमोर मान वाकवली नाही. गोंदियापासून गोव्यापर्यंतची तमाम दैनिके आणीबाणीने गारद करून टाकलेली होती. मोजकी २ । ३ साप्ताहिकेच आपले स्वत्व टिकवून, जुलुमाविरुद्ध जमेल तशी धीट चढाई करीत होती. यापैकी एक ‘ विवेक ’ साप्ताहिक होते. ही ज्या साप्ताहिकाची गौरवास्पद कामगिरी ते एकाएकी बंद का केले जावे ? आजवर जसे नुकसान सहन करीत, ध्येयवाद म्हणून विवेक चालवला गेला तसा तो यापुढे चालवणे एकाएकी का अशक्य व्हावे ? पालेकर निवाड्यामुळे हा निर्णय घ्यावा लागला असे संचालकांनी म्हटले आहे ( विवेक, २२ फेब्रुवारी १९८१ अंक) पण हे म्हणणे अधिक स्पष्ट व खुलासेवार हवे होते. पालेकर निवाडा विवेकला कसा लागू होतो, त्यामुळे विवेकवरचा आर्थिक बोजा किती वाढतो


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : विसावे**

**अंक : चाळिसावा**

**७ मार्च १९८१**

**किंमत : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

यासबंधीची निश्चित आकडेवारी पुढे आली असती तर विवेकच्या चहात्यांनी यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला नसता का? विवेकलाही सुरू होऊन बत्तीस वर्षे झाली होती. आजवर चहात्यांच्या व सवसहानुभूतीदाराच्या सक्रिय पाठिंब्यावरच विवेक चालला. केवळ विक्रीवर, वर्गणीदारावर व तुटपुज्या जाहिरातीवर विवेकसारखे ध्येयवादी साप्ताहिक चालू राहणे शक्यच नव्हते. मग हा सहानुभूतीदाराचा सक्रिय पाठिंबा यापुढे मिळणार नाही, असे विवेकच्या संचालकांना का वाटले? का भाजपने गांधीवादी समाजवाद स्वीकारल्यामुळे विवेकचा ठाम हिंदुत्ववाद सचालकाना गैरसोयीचा किंवा नकोसा वाटू लागला? भाजप हा राजकीय पक्ष आहे. मते मिळवण्यासाठी या पक्षाला हिंदुत्ववादापासून फारकत घ्यावीशी वाटत असेल तर तसे करण्यास तो मोकळा आहे. येथेही सावरकर खरे ठरले म्हणायचे! तुमची काँग्रेस होईल असे त्यांनी श्यामाप्रसादांना जनसंघस्थापनेच्या वेळीच सांगितले होते. पण विवेकला काही मते मिळवायची नव्हती. जोवर येथे अराष्ट्रीय, उपराष्ट्रीय किंवा कम्युनिझमसारख्या अतिराष्ट्रीय निष्ठा असलेले पक्ष, गट आहेत, विभाजनवादी चळवळी चालू आहेत, तोवर विवेकनिष्ठ हिंदुत्ववादाचे कार्य संपले आहे असे म्हणता येणार नाही. या गटाना, चळवळींना, विभाजनवादी जनसमूहांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्याचे प्रचंड कार्य अद्याप बाकीच आहे. हे कार्य कोणत्या आधारावर, कोणत्या पद्धतीने करावयाचे हे हिंदुत्ववाद सागतो; नुसते सागत नाही तर प्रत्यक्ष करून दाखवतो. काँग्रेस अनुनय आणि लालूच या मार्गाने हे कार्य करू पाहत होती. म्हणून हिंदुत्ववाद्यांना आपला वेगळा आखाडा खोलावा लागला. आदिवासी समाज असो, मुस्लिम अल्पसंख्याक असोत किंवा दक्षिण विरुद्ध उत्तर असा वाद असो. एका भारतीय परंपरेचे, एका समान सांस्कृतिक प्रवाहाचे हे सगळे घटक आहेत; हा प्रवाह पुढे नेण्याची जबाबदारी सर्वांवर आहे; या प्रवाहापासून अलग होण्याचे, फुटून निघण्याचे स्वातंत्र्य कोणालाही नाही, ही जाणीव प्रथम हिंदुत्ववाद्यानी जागृत केली व हे जाणीवजागृतीचे कार्य यापुढेही काही काळ करत राहावे लागणारच आहे. मुस्लिम समाज अलग रहात होता, फुटून निघू पाहत होता म्हणून उघडच हिंदुत्ववाद्यानी पहिली आघाडी मुसलमानांविरुद्ध उघडली. पण ही आघाडी लढवत राहणे एवढेच काही हिंदुत्ववादाचे इतिकर्तव्य नाही. दलित समाज दुरावलेला आहे. त्याचा मागासलेपणा दूर करून, त्याला इतरांच्या बरोबर आणल्याशिवाय तो मुख्य राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप कसा होणार? भाजपची वाटचाल गांधी-नेहरूंच्या अनुनय-लालुच मार्गाने सुरू आहे. हा मार्ग शेवटी पाकिस्ताने जन्माला घालतो, समाजाचे तुकडे पाडतो हे आता पुरेसे सिद्ध झालेले आहे. पुन्हा हे सत्याचे, अनुनयाचे प्रयोग कशासाठी, हे विचारणारा एखादा हिंदुत्ववादी 'विवेक' हवाच होता व आहे. तो अचानक व एकाएकी बंद व्हावा, केला जावा याचे म्हणूनच वाईट वाटते. अशी ध्येयवादी, एखाद्या विचारसरणीशी बांधलेली साप्ताहिके, नियतकालिके चालवणे म्हणजे वाळवंटातली वाटचाल आहे! मागचा पाय कर्जातून बाहेर निघाला की पुढचा अधिक खोलवर रुतलेला असतो. मैलोन् मैल, वर्षानुवर्षे झळा सहन करीत, वैराण वाटेवरून नुसते चालत राहायचे. मृगजळ सारखे पुढे पुढेच जात असते चंद्रकोरीसारखा एखादा तुरळक वाचक! मधुनच केव्हातरी लागणारी जाहिरातीची एखादी हिरवळ! यावर समाधान मानून चालत राहायचे. नाही तर कुणाला तरी विकले जायचे. विवेक असा कुणाला शेवटपर्यंत विकला गेला नाही. विवेकचे इमान पक्के होते. मान ताठ होती. त्यामुळेच कदाचित् असावे, विवेक बंद पडला याची कुणी फारशी दखल देखील घेतलेली नाही. एक बातमी मोठ्या वृत्तपत्रातून येऊन गेली तेवढीच काय ती नोंद. लंडन टाइम्स बंद पडणार या बातमीनं अस्वस्थ होणाऱ्या आपल्या वृत्तपत्रांनी स्वाभिमानी विवेकची नोंद नाही तरी का घ्यावी?

'माणूस'ला मात्र ती घ्यावीशी वाटली.

कारण रात्र स्वातंत्र्याच्या वैऱ्यांची आहे.

आणि....आणि

दिवस भिक्षुकशाहीचे आहेत.

भिक्षुक म्हणून जगण्याचे नाकारणाऱ्या विवेकची म्हणूनच ही एक कृतज्ञतापूर्वक नोंद आणि एक मित्रतापूर्वक नमस्कार ही.

आज तरी शेवटचा.

उद्याचे काय सागावे?

हिंदूचा पुनर्जन्मावर विश्वास असतो. कशावरून होणार नाही विवेकचा पुनर्जन्म?

—श्री. ग. मा.

□

## पुणे वार्ता

# 'विकली'चे शताब्दीप्रदर्शन

टाइम्स गटाचे 'इलस्ट्रेटेड विकली' हे एक देशातलं महत्त्वाचं इंग्रजी साप्ताहिक देशातल्या आणि काही वेळा परदेशातल्याही महत्त्वाच्या घडामोडीची सचित्र नोंद या साप्ताहिकाने न चुकता घेतलेली आहे. देशातल्या सार्वत्रिक निवडणुकापासून तर मध्यंतरी राजस्थानात उचल खाल्लेल्या सतीच्या चालीपर्यंत अनेक राजकीय–सामाजिक घडामोडी प्रभावी छायाचित्रासह 'विकली'ने वाचकांपुढे ठेवल्या. म्हणूनच अनेक साप्ताहिके आली आणि गेली तरी 'विकली'चे स्वतःचे वैशिष्टयपूर्ण स्थान अबाधित राहिले.

१८८१ साली सुरू झालेले हे साप्ताहिक यंदा आपले शतकमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे या निमित्ताने गेल्या शंभर वर्षातल्या सर्व क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घटनांची 'विकली'च्या छायाचित्रकारानी घेतलेली नोंद एका खास प्रदर्शनाद्वारे वाचकांसमोर मांडली जात आहे.

पुण्यातल्या बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात हे प्रदर्शन नुकतेच भरवण्यात आले. दालनात प्रवेश केला आणि सुरुवातीलाच संयोजकांनी प्रदर्शनाच्या उद्देशाविषयी केलेले निवेदन दृष्टीस पडले. या निवेदनात असे म्हटले होते की, गेल्या शंभर वर्षांतील राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक भारताचे दर्शन या ठिकाणी घडेल.

प्रदर्शन पाहायला सुरुवात केली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातली मुंबई काही छायाचित्रांमध्ये पकडली होती. त्यात मुंबईचे बंदर होते, रस्ते होते, ट्राम होती आणि 'बेस्ट' बसचा तिच्या पहिल्या ड्रायव्हरसकट घेतलेला एक फोटोही होता. याबरोबरच तत्कालीन लोकांचे पेहराव आणि राहणीही फोटोद्वारे व्यक्त होत होती. ते सारे पहाताना मोठी गंमत वाटत होती.

विसावं शतक सुरू झालं आणि महत्त्वाच्या असंख्य राजकीय उलथापालथीचं सावट साऱ्या जगावर पसरलं. त्यात पहिलं महायुद्ध होतं, रशियातली क्रांती होती, भारतातल्या लाल–बाल–पाल या त्रयीचा ठसा होता आणि महात्माजींचं अहिंसक आंदोलनही होतं. हिटलर आला, रुझवेल्ट आला, चर्चिल आला, दुसरं महायुद्ध झालं, नागासाकी–हिरोशिमावर ऐतिहासिक बाँब पडले, अमानुष युद्धाच्या खाईत सारं जग लोटलं गेलं. या सर्व घटनाची नोंद होत असतानाच ब्रिटनच्या निरनिराळया क्रमाकाच्या राजा–राज्याच्या भारतभेटी आणि लॉर्ड–माउंट बॅटनचा झालेला विवाहही 'विकली'च्या छायाचित्रकारानी टिपला होता.

भारताचं स्वातंत्र्य जवळ आलं, गांधीजी तुरुंगात गेले, देशाचे दोन तुकडे झाले, प्रचंड यादवी माजली, निर्वासितांच्या छावण्या जागोजाग पडल्या, देश स्वतंत्र झाला.

स्वातंत्र्यानंतरही राजकारणाचा जोर ओसरला नाही. पंडितजी–केनेडी भेट झाली, पंडितजी–चाऊ एन लाय मिठी झाली, भारत–चीन युद्धही झालं. नेहरूंचं निधन झालं. शास्त्रीचं निधन झालं. इंदिराजी सत्तेवर आल्या. दरम्यान भारत–पाकिस्तान युद्ध होऊन गेलं.

पुन्हा '७१ साल आलं, आणखी एक युद्ध झालं.'

१९७७ ची ऐतिहासिक निवडणूक झाली, दिल्लीत गांधीजींच्या समाधीजवळ शपथा झाल्या, मोडल्या गेल्या. '८० ची निवडणूक आली. इंदिराजी पुन्हा सत्तेवर आल्या.

गेल्या शंभर वर्षांतल्या 'राजकीय, सामाजिक, आर्थिक व सास्कृतिक भारत'चं 'विकली'च्या छायाचित्रकाराना घडलेलं दर्शन हे असं होतं. प्रदर्शन चागलं होतं, छायाचित्रकाराची बुद्धी आणि कौशल्य प्रत्येक फोटोमधून प्रतीत होत होती; पण एवढया मोठया साप्ताहिकानं शंभर वर्षांचा आढावा घेण्याच्या उद्देशानं भरवलेल्या छायाचित्र–प्रदर्शनाला जी एक व्यापक सर्वंकषता अपेक्षित होती तिचा मात्र इथं पूर्ण अभाव वाटला!

संयोजकानी सुरुवातीच्या निवेदनात जरी गेल्या शंभर वर्षांतल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व सास्कृतिक भारताचं दर्शन तुम्हाला इथं घडेल, असं आश्वासन दिलं होत तरी प्रदर्शन पाहून दालनातून बाहेर पडताना त्याची फारशी पूर्ती झाल्यासारखं वाटलं नाही.

नाही म्हणायला उजव्या हाताच्या एका कोपऱ्यात भारतातले काही प्रमुख गायक' वादक, कलाकार, शास्त्रज्ञ यांचे फोटो लावलेले होते; पण त्यात शंभर वर्षांमधल्या सास्कृतिक, वैज्ञानिक भारताचं प्रतिबिंब नव्हतं. एकूण प्रदर्शनाचा तीनचतुर्थांशापेक्षाही जास्त भाग राजकीय घडामोडीनी व्यापला होता आणि त्यातही भारतातल्या घडामोडीना एकचतुर्थांशच स्थान व महत्त्व होतं. कदाचित फोटोची आकडेवारी देऊन हे प्रमाण कमीजास्त दाखवता येईल; पण बहुतेक वेळा आकडेवारी फार फसवी असते व वस्तुस्थितीचं योग्य मूल्यमापन आकडेवारीच्या साहय्यानं नेहमीच करता येत नाही.

यातूनच प्रदर्शनाच्या वैगुण्याबद्दलचा दुसरा मुद्दा येतो तो म्हणजे या सर्व घटनांची नोंद 'इंग्रज' कॅमेऱ्यामधून घेतलेली होती, त्यामुळं प्लेगच्या साथीनं ओसाड पडलेल्या पुण्यातल्या पेठा इथ होत्या, पण त्या प्रकरणी रँडसाहेबाचा वध करणारे चापेकर नव्हते. राजकीय चळवळीपासून काहीसं अलिप्त राहून समाजप्रबोधनाचं मोठं कार्य करणाऱ्या महात्मा फुल्यांच्या चळवळीला या प्रदर्शनात स्थान नव्हतं. देशाच्या विभाजनानंतर झालेल्या दंगलीमध्ये निर्वासिताचे अश्रू पुसणारी फक्त एक इंग्रज मडमच या छायाचित्रकारांना टिपता आली. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सावरकरापासून बाबू गेनूपर्यंत विविध स्तरांवर इथे देशभक्त निर्माण होत असताना कुठल्याशा इंग्रज राजपुत्राची गाडी ओढणारे नोदलाचे सैनिक 'विकली' च्या छायाचित्रकाराना जास्त महत्त्वाचे वाटले, कुठल्याशा इंग्रज राणीचे जागोजाग भरलेले शाही दरबार जास्त महत्त्वाचे वाटले, सैनिकाच्या तलवारीच्या कमानीखालून जाणाऱ्या नवपरिणत दांपत्याचे फोटो जास्त महत्त्वाचे वाटले.

कोणत्याही भडक देशभक्ताच्या भूमिकेतून मी हे लिहीत नाही. माझी फक्त एवढीच तक्रार आहे की गेल्या शंभर वर्षांतला आमचा राजकीय, आर्थिक, सामाजिक, सास्कृतिक भारत हा नव्हे. राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक व सास्कृतिक परिवर्तनाची ऐतिहासिक गरज याची इथं दुर्दैवानं एकाच काळात गाठ पडली. अशा वेळी राजकीय स्वातंत्र्य व त्यापाठोपाठ ओघानच येणाऱ्या

सत्तेकडे पाठ फिरवून ज्यांनी सामाजिक व सांस्कृतिक बदलासाठी उभं आयुष्य वेचलं त्याचे फक्त एका कोपऱ्यात' फोटो लावून बोळवण करणं म्हणजे शभर वर्षांतल्या भारताचं सामाजिक, सास्कृतिक चित्रण नव्हे, हे वृत्तपत्रव्यवसायात शभर वर्षं काढलेल्यांच्या तरी लक्षात यायला हरकत नव्हती; पण इथे ती दृष्टीच हेतुतः ठेवलेली नव्हती; याचं जास्त वाईट वाटत. स्वातंत्र्यपूर्व काळात रावसाहेब, रावबहादुर असल्या ब्रिटिश सत्तेच्या पदव्यांच्या कोरडया तुकडयासाठी लाळ घोटणारे तत्कालीन एतद्देशीय आणि '्विकली ' चे हे छायाचित्रकार यात कोणता गुणात्मक फरक आहे? चीड त्याच्या लाचारीबद्दल नाही; पण मनुष्य असून स्वाभिमानाची आच असू नये याचं जास्त दु.ख वाटतं !

शेवटी अशी भूतकालात नेणारी प्रदर्शनं तरी कशासाठी भरवली जातात? तर प्रत्येक माणसाला जसे भविष्याचे वेध असतात तशीच भूतकाळाबद्दलची एक अनामिक ओढही असते. मध्यंतरी याच 'बालगधर्व' च्या कलादालनात शभर वर्षांपूर्वीचं पुणं कोणताही मोठा दावा न करता चित्रित केलं होतं. ते पाहायला गर्दीही चागली होती. कारण पन्नास-साठ वर्षांपूर्वी, सत्तर वर्षांपूर्वीचे पुण्यातले रस्ते कसे होते, पुण्याच्या पेठा कशा होत्या, इथला लकडीपूल, इथली पर्वती, इथल्या तळयातला गणपती कसा होता हे चित्राद्वारे का होईना पण पाहण्याची ओढ प्रत्येक पुणेकराला होतीच आणि त्या प्रदर्शनाने त्याची तृप्तीही केली होती. गेल्या पन्नास–शंभर वर्षांचंच कशाला, माणसं उन्हा–तान्हात भूमी खोदत जुनी लेणी, जुनी घराणी, मोहें जो दारो आणि सिंधुसंस्कृती तरी कशासाठी खणून काढतात ? भूतकालाविषयीचे अगाध कुतूहल हीच त्यामागची मूळ प्राथमिक भावना असते. 'विकली 'नं भरवलेलं हे प्रदर्शन पाहायला येणाऱ्या प्रत्येकाच्याच मनात ही भावना उद्दीपित झाली असणार आणि ती न शमताच विभूनही गेली असणार !

असो. आणखी शंभर वर्षांनी या दर्जेदार साप्ताहिकाची द्विशताब्दी साजरी होईल. त्या वेळी तरी तत्कालीन संयोजक याचं भान ठेवतील अशी आशा करण्यापलीकडे आपण तरी काय करू शकतो? कारण तोपर्यंत आपणही इतिहासाचेच भाग झालेलो असतो.

— प्रतिनिधी

---

# दवंडी : तंबाखू आंदोलनाची

विजय परुळकर

संयुक्त महाराष्ट्राचं स्वप्न ज्या बेळगाव जिल्ह्यामुळे अपुरं राहिलं त्यामधील सीमावादात 'अडकवून' ठेवलेलं एक ठिकाण— निपाणी. स्वार्थी राजकारण्यानी अधूनमधून सीमाप्रश्नाचा वाद जागता ठेवून निपाणीच्या नावे स्वत.च्या तुबडया भरून घेतल्या. निपाणीसाठी केलं मात्र काहीच नाही.

निपाणी म्हणजे देवदासी ! निपाणी म्हणजे विडीकामगार स्त्रिया ! निपाणी म्हणजे तंबाखूकामगार स्त्रिया ! निपाणी म्हणजे तंबाखू ! ह्या तबाखूशी निगडीत असलेले सर्वच प्रश्न सीमाप्रश्नापेक्षा केव्हाही जास्त महत्त्वाचे. ह्या तंबाखू उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न महत्त्वाचे—पण दुर्लक्षित ! निपाणीचा तंबाखू गुजराथ किंवा इतर भागातील तंबाखूत मिसळल्याशिवाय विडीला स्वादच येत नाही अशी इकडच्या तबाखूची ख्याती. निपाणी म्हणजे तबाखूची केवढी भलीमोठी बाजारपेठ !

निपाणी हे केवळ सीमावादात अडकलेले गाव नसून निपाणी म्हणजे तंबाखू उत्पादक शेतकरी, तंबाखू कामगार स्त्रिया, विडीकामगार स्त्रिया आणि सवस्व हरविल्यामुळे जोगतिणी–देवदासी झालेल्याचं अमानुष शोषण करणारा साक्षात नर्क. मध्ययुगातील गुलामगिरीच्या प्रथेलाही शरमेनं मान खाली घालावी लागेल असा भयानक प्रकार आजही–विसाव्या शतकाच्या अखेरीस निपाणीमध्ये दिवसाढवळ्या राजरोसपणे पहावयास सापडतो.

निपाणी म्हणजे चाळीस–पन्नास तंबाखू व्यापारी, विडीकारखानदार आणि दलाल ह्याची जहागीर. दलालामधील सर्वश्रेष्ठ दलाल देपचंद शहा. त्याचा दरारा मोठा. ते साऱ्या भारताचे 'टोबॅको किंग !' तंबाखू सम्राट ! त्यांच्या इशाऱ्यावर तंबाखूचा भाव ठरतो. त्याच्या इशाऱ्यावर निपाणीतील व्यवहार चालतो. निपाणीचे हे नवकोट नारायण !!

निपाणीमधील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांनी आणि कामगार स्त्रियानी पै-पैसा गोळा करून आपल्या मुलांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून जनता कॉलेज स्थापन केले. ह्या नवकोट नारायणांनी काही हजार रुपयाची देणगी देऊन हे विद्येचे मंदिर विकत घेतले आणि त्यास आपले नाव दिले. पैशाने काहीही विकत घेता येते असा त्याचा आजपर्यंतचा अनुभव असावा.

—आज मात्र तंबाखू सम्राटाच्या ह्या अनुभवाला तडा जातो आहे. 'त्यांच्याच' कॉलेजमध्ये शिकविणारा, सुरुवातीला महिना फक्त

एकशेपस्तीस रुपये पगार मिळवणारा एक झुंजार प्राध्यापक देवचंद वाल्यांना लाखो रुपये दिले तरी विकत घेता येणार नाही असा अभूतपूर्व साक्षात्कार घडला आहे.

ह्या तडफदार प्राध्यापकाचं नाव सुभाष जोशी. वय असेल पस्तीशीच्या आसपास. आज हा प्राध्यापक आणि त्याची सुनिता आपलं सर्वस्व पणाला लावून रक्तपिपासू दलालांच्या विरुद्ध निधड्या छातीनं उभे आहेत. निपाणीमध्ये फक्त देवदासींचीच समस्या आहे किंवा विडी आणि तंबाखू कामगार स्त्रियांना धनाढ्य व्यापाऱ्यांच्या विकृत लिंगचेष्टेचे बळी व्हावे लागते–एवढ्याच 'सनसनाटी' समस्या आहेत, अशी ज्यांची कल्पना झाली असेल त्यांनी गेल्या महिन्यात निपाणीमध्ये जे अघटित घडत आहे त्याचा अभ्यास करणं जरुरीचं आहे. तंबाखू शेतकऱ्यांचा प्रश्न म्हणजे बड्या बागायतदारांचा प्रश्न किंवा विडी आणि तंबाखू कामगार स्त्रियांचा प्रश्नच तेवढा महत्त्वाचा, अशी भाबडी समजूत करून घेणं चूक ठरेल.

फेब्रुवारीचा संपूर्ण महिना मी निपाणीच्या वाऱ्या केल्या. निपाणीमध्ये मी जे अभ्यासलं, ऐकलं, पाहिलं ते 'माणूस'च्या वाचकांसमोर ठेवण्याची माझी इच्छा आहे. ('खैबरनामा' अर्थातच काही काळ स्थगित ठेवणं अपरिहार्य आहे.)

निपाणीमधील तंबाखू उत्पादक शेतकरी, विडीकामगार स्त्रिया, तंबाखू कामगार स्त्रिया आणि दरिद्रतेमुळे जोगतिण किंवा देवदासी व्हावं लागलेल्या स्त्रिया ह्या सर्वांच्या समस्या निवारणाचं केंद्रस्थान असलेल्या सुभाष जोशींच्या घरी तीन वेळा जाण्याचा–अनेक दिवस रहाण्याचा योग आला. तिथं राहून आणि निपाणीच्या परिसरात फिरून मी आणि माझी बायको सरोजानं जे अनुभवलं, ते कथन करणं आवश्यक आहे असं आम्हाला वाटतं.

'शेतकऱ्याच्या शेतमालाला त्याचा उत्पादनखर्च भरून मिळेल असा भाव मिळालाच पाहिजे' ही शेतकरी संघटनेची घोषणा आता कर्नाटकाच्या सीमेला भिडली आहे. शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी ह्यांनी ह्या परिसराचा दौरा करून ता. २४ फेब्रुवारी रोजी निपाणी येथे एका विराट शेतकरी मेळाव्यात तंबाखू शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलं. शरद जोशींव्यतिरिक्त ज्यांची निपाणी परिसरातील शेतकरी अतिशय उत्सुकतेने वाट पहात होते ते नाशिक आंदोलनाचे सूत्रधार माधवराव खंडेराव मोरे मेळाव्यास येऊ न शकल्याने हजारो शेतकऱ्यांची निराशा झाली. निपाणीमधील ह्या शेतकरी मेळाव्यास कामगार स्त्रियांनी संपूर्ण पाठिंबा जाहीर केला आणि कॉलेज विद्यार्थ्यांनीदेखील उत्स्फूर्त सहभाग घेतला.

झुंजार प्राध्यापक सुभाष जोशी ह्या निःस्वार्थी तरुण नेत्याच्या मागे निपाणीच्या परिसरातील बळीराजा, त्याची पत्नी आणि भावी पिढी भक्कमपणे उभी आहे. दहा हजार कामगार स्त्रियांच्या संघटनेला मार्गदर्शन करणाऱ्या ह्या तरुण नेत्यानं आपलं व्यासपीठ शेतकरी संघटनेचा योद्धा शेतकरी शरद जोशी ह्याला खुले करून दिले आहे. सर्वत्र दुफळीचं राजकारण आणि सत्तेची स्पर्धा दिसत असताना सुभाष जोशींचा हा त्याग इतरांना मार्गदर्शक ठरावा असा आहे.

उत्पादक शेतकरी आणि ग्राहक ह्या दोघांचंही शोषण करणारा जो दलाल, त्याच्याविरुद्ध निपाणीमध्ये लढा उभा केला जात आहे. तंबाखू शेतकऱ्यांच्या मागण्या जर दलालांनी आणि सरकारनी मान्य केल्या नाहीत तर पंधरा मार्चपासून कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुजराथ येथील तंबाखू शेतकरी आंदोलनाची तयारी करणार.

जवळजवळ एक शतक तंबाखू शेतकऱ्यांचं, तंबाखू आणि विडीकामगारांचं शोषण करून गडगंज संपत्ती जमा केलेल्या मूठभर व्यापारी–दलालांना वेळीच शहाणपण सुचणार आहे का? शेतकऱ्याला त्याचा उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव देण्याची ते तयारी दाखवणार का?

काळ ह्या गोष्टींची उत्तरं देईल. एक गोष्ट मात्र निश्चित. शेतकऱ्याला नागवणाऱ्यांच्या पापाचे घडे आता भरत आले आहेत. तंबाखू उत्पादक शेतकऱ्याला जर आंदोलन करणं भाग पडलं–ह्या आंदोलनासाठी शेतकरी जर संघटित झाला, संघटितपणा टिकवून धरू शकला तर शेतकऱ्याला लुटणारे नामोहरम होणार हे निश्चित! इतिहासपुरुषाचीच तशी इच्छा आहे. व्यापारी आणि दलाल इतिहासपुरुषाला विकत घेऊ शकत नाहीत.

निपाणी येथे सुरू होणारी तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांच्या लढ्याची कहाणी लवकरच 'माणूस'मधून वाचकांना सादर करण्यात येईल.

□


**व्हान गॉग**

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक

प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

मुक्ताफळे

# इरफान हबीब मुर्दाबाद !

'भारताच्या संस्कृतीत व सभ्यतेत इस्लामच्या वाटा' अशा विषयावर परिषद भरू शकते, हे वृत्तपत्रातून आम्हास कळले म्हणून आमचा यावर विश्वास बसला. साधीसुधी परिषद नाही, आंतरराष्ट्रीय परिषद. तीन दिवस चालणारी प्रचंड परिषद ! २८ जानेवारीला दिल्लीत पंतप्रधान इंदिरा गाधी यानी या परिषदेचे उद्घाटन केले. इस्लामच्या सभ्यतेबद्दल काय बोलावे हा प्रश्नच इंदिराजीना पडला नाही. त्यांनी या विषयावर न बोलता 'भारतात इस्लाम सतत वृद्धिंगत होत जाईल', असे आश्वासन फक्त जमलेल्याना दिले. आतरराष्ट्रीय पंडित या अफाट विषयावर बोलतात तरी काय याचे आम्हाला अपार औत्सुक्य होते. इतक्या चागल्या समारंभाला आम्हाला काही जाता आले नाही; परंतु आमचे मित्र उर्दूचे सुविख्यात प्राध्यापक हैदरअली हे परिषदेला जाऊन आल्याचे कळले. म्हणून आम्ही त्यांची भेट घेतली.

'कशी काय झाली परिषद ?'

'परिषद फारच छान झाली. सुरुवातीला कुराणपठण झाले. मग पैगंबराच्या प्रशंसापर कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. इंदिराजीका भाषण, हिदायतुल्लासाबका भाषण–'

'इस्लामच्या सांस्कृतिक कॉन्ट्रिब्यूशनबद्दल, हैदरअलीसाहेब, आम्ही केवळ अज्ञानी नाही तर साशकही आहोत. कारण याबद्दल महाराष्ट्रात विद्वानानी जे लिहिलं आहे ते वाचून अंत:करणाला घरे पडतात. तुम्हाला तर्कतीर्थ जोशी ठाऊक असतील ?'

'हां हा– वो जो अभी एटी हो गये. यशवतराव चव्हाणके गुरु माने जाते है–'

'हा तेच; तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. त्यानी 'वैदिक संस्कृतीचा विकास' हे पुस्तक लिहिले आहे. त्यात ते म्हणतात की, हिंदूच्या मूर्तिकला, वास्तुकला व चित्रकला यावर मुसलमान राज्यकर्त्यांनी प्रचंड प्रहार करून हिंदूच्या मनावर कायमची जखम केलेली आहे. नष्ट केलेले छिन्नविच्छिन्न अवशेष, हा हृदयविदारक क्रूरपणा व रानटीपणा सूचित करतात– प्राणाचा व जीवनशक्तीचा साक्षात्कार हे प्राचीन हिंदुकलाचे ध्येय होते. या ध्येयावर इस्लामी तलवारीने आघात केला. यामुळे अजंठा येथील चित्रकलेनंतर भारतीय चित्रकलेचा अवतार समाप्त झाला. हिंदुस्थानात उच्च प्रकारची मुसलमानी संस्कृती आलीच नाही. कारण अफगाण व मोगल राज्यकर्त्यांना ती लाभली नव्हती'

'नही जी. ऐसा लिखना ठीक नही. मोगल नही आते तो ताजमहाल नही बनता ! फॉरेन एक्स्चेंज नही मिलती ! कितने फॉरिनर्स कुतुबमीनार, ताजमहाल देखने आते है । ये सब हिंदू-मुस्लिम संस्कृती का मिलाफ है ।'

आम्हाला हा अजब मिलाफ त्रासदायक वाटत होता. कुतुब मिनारभोवती अनेक मंदिरांचे भग्नावशेष आम्ही पाहिले होते. मंदिरे पाडून त्यांच्या दगडानी मीनार बांधणे म्हणजे का हिंदु-मुस्लिम मिलाफ ? प्राध्यापक हैदरअलीच्या घरातच आम्ही चहा पीत असल्याने आम्हाला काही बोलता येईना; पण तितक्यात प्राध्यापकांच्या टेबलावरील एका पुस्तकाकडे आमचे लक्ष गेले. इटालियन प्रवासी निकोलय मनुचीचे 'Storia Do Mogor'–' असे होते मोगल' हे ते पुस्तक. हे पुस्तक आम्ही वाचलेले होते. म्हणून ते हाती घेऊन आम्ही नेमके पान काढले व प्राध्यापकाना म्हटले–

'हिंदू-मुस्लिम सास्कृतिक ऐक्याची मोगलाची कल्पना काय होती ? उदेपूरच्या राण्याकडे औरंगजेबाने केलेल्या या पाच मागण्या वाचा. पृ. १९६. एक : राण्याने मुसलमान व्हावे व आपली मुलगी बादशहाच्या मुलाला दिली पाहिजे. दोन : उदेपूरच्या राज्यात औरंगजेबाची नाणीच फक्त चालली पाहिजेत. तीन : उदेपूर राज्यात गोवधबंदी उठली पाहिजे. चार : उदेपूर राज्यातील सर्व देवळे पाडण्यात येऊन त्या जागी मशिदी बाधल्या पाहिजेत आणि पाच : शरियत कायद्याचा अंमल सर्व उदेपूर राज्यात असला पाहिजे !'

प्राध्यापक जरा विचारात पडले; पण क्षणात उत्साहाने म्हणाले– 'वो सब पुराणी बाते है !'

'पण दोन शतकापूर्वीचा तर हा इतिहास आहे. ही असभ्यता, हे क्रौर्य, ही अमानुषता आम्हाला मंजूर नाही ! औरगजेब आणि त्याचे बापजादे जुलमी होते. क्रूर होते. हिंदूवर त्यांनी अनन्वित अत्याचार केले. जबरदस्तीने हिंदूना बाटवले. या सर्व गोष्टी वाईट आहेत. भारतीय सभ्यतेला गालबोट लावणाऱ्या या गोष्टी आहेत, असे या परिषदेत आतरराष्ट्रीय विद्वानानी स्पष्ट केले असेल की नाही ?'

'छे: छे. ! असे करून चालणार नाही. अलिगड विद्यापीठातील इतिहासाचे प्राध्यापक व समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. इरफान हबीब याची हकीगत वाचली नाही तुम्ही ?'

'नाही बुवा !'

'अहो, या प्रा. हबीबने हा शहाणपणा केला नुकताच ! त्याने 'इंडियन एक्स्प्रेस' ला मुलाखत दिली. मोगलाचा हा इतिहास वाईट आहे असे मतप्रदर्शन केले. झाल– अलिगड विद्यापीठात तूर्त दंगल उसळली आहे. तिथे विद्यार्थी वसतिगृहात मुसलमान गुंड रहातात हे ठाऊक असून प्राध्यापक हबीबने असे का बरे वागावे ? 'लाँग लीव्ह इस्लाम' आणि 'हबीब मुर्दाबाद' अशी पत्रके विद्यापीठात लागली आहेत मुसलमानाच्या इतिहासातील दुष्कृत्याची वा मुसलमानधर्माची चिकित्सा विद्यार्थ्यांना मंजूर नाही !'

'म्हणजे तुमच्या परिषदेतसुद्धा अशी चिकित्सा झालीच नाही की काय ?'

'अहो, परिषदेत असले काही झाले नाही. नाही तर दगल झाली असती ना ? दिल्लीची परिषद ही इस्लामच्या असभ्यतेतील सभ्यता शोधण्यासाठी होती. इंदिरा गांधी तर अलिगड विद्यापीठाचे मुस्लिम स्वरूप कसे कायम राहील याच्या प्रयत्नात आहेत.'

अलिगड पद्धतीनेच भारतात इस्लाम वृद्धिंगत झाला तर काय होईल, याची चिंता करायला राजकारण्याना वेळ नाही कारण जात्यंध मुसलमानानाही मते असून ते बहुसंख्य आहेत, ही वस्तुस्थिती सर्वांनी ध्यानात घेतली आहे.

प्रा हैदरअलीना देखील 'इरफान हबीब मुर्दाबाद' हीच घोषणा मंजूर होती. भारतीय सभ्यतेत बहुतेक सुशिक्षित मुसलमानाचा हा एवढाच वाटा आहे ! इरफान हबीब एखादाच,

— ग्यानबा

अवतीभवती । शरद कृष्णन्

# □ मुख्यमंत्र्यांना इंदिराजींचा पाठिंबा

पाठीशी प्रचंड बहुमत, दिल्लीकडून सर्वतोपरी सहकार्य, स्वतःच्या पसंतीचे सहकारी. तात्पर्य काय तर परिस्थिती सर्वच बाजूंनी इतकी अनुकूल की, बिनधास्तपणे पाच वर्षे राज्य करता यावे; पण अशा अनुकूल परिस्थितीमध्ये असूनही अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्याना सत्ता राबवून, स्वतःचा आणि आपल्या मंत्रिमंडळाच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवण्याची किमया जमलेली नाही आणि यापैकी बहुतेक मुख्यमंत्र्याच्या मार्गांमधील अडथळा, स्वतःच्या पक्षामधील असंतुष्ट आले आहेत. बहुतेक सर्व राज्यांमधील असंतुष्ट मंडळींनी आपले गट जमवले आणि आपआपल्या मुख्य मंत्र्याविरुद्ध प्रचंड आरडाओरडा करण्यास आणि त्यांच्यावरील विविध आरोपांची मंडोळी घेऊन दिल्लीला धावण्यास सुरुवात केली. संजयच्या आशीर्वादाने ज्या मंडळींना मुख्यमंत्रीपदाची खुर्ची मिळाली होती अशा मंडळींविरुद्ध केन्द्रस्थानी सत्ता राबवणाऱ्या मंडळींच्या आशीर्वादाने बंडाचे झेंडे फडकविले गेले. मध्यप्रदेशच्या अर्जुनसिंग यांच्या विरुद्ध प्रारंभी पी. सी. सेठी आणि नंतर व्ही. सी शुक्ला यांनी आघाडी उघडून प्रखर टीकेचे तोफगोळे डागले. केन्द्रीय शासनामध्ये गृहमंत्रिपद भूषवणाऱ्या झैलसिंग यांनी पंजाबवर आपले लक्ष इतके केन्द्रित केले की त्या राज्याचे मुख्यमंत्री दरबारासिंग याना थेट इंदिराजींपर्यंत धाव घ्यावी लागली. उत्तर प्रदेशामध्ये, विश्वनाथ प्रतापसिंग यांच्याविरुद्ध उठाव करणाराना कमलापती त्रिपाठी यांचे आशीर्वाद मिळाले. आंध्रप्रदेशात चेन्ना रेड्डी याची उचलबांगडी करणाऱ्या तेलगंणामधील एक नेते व्ही. राजाराम आणि दुसरे एक नेते पी· केशावतारम् याचेकडे हे श्रेय जाते. या दोघांच्याही निष्ठा परराष्ट्रमंत्री पी. नरसिंहराव याच्या चरणी वाहिलेल्या आहेत.

आपल्या हाती असलेल्या सत्तेला सुरुंग लावण्याचे काम दिल्लीत बसलेली स्वतःच्या पक्षाचीच बुजुर्ग मंडळी करत आहेत हे लक्षात आल्यावर मुख्यमंत्र्यांनी दिल्लीला जाऊन आपल्याला सतत पाठिंबा मिळावा यासाठी एक लॉबी तयार करून इंदिराजींशी सतत संपर्क ठेवला. दिल्लीला किती फेऱ्या माराव्यात याचा काही ताळमेळच राहिला नाही. एका पहाणीनुसार जून ८० मध्ये सत्तेवर आल्यापासून आठ राज्यांच्या मुख्यमंत्र्यानी प्रत्येकी किमान शंभर दिवस दिल्लीमध्ये मुक्काम ठोकला ! आता यातील किमान ६० ते ७० दिवस स्वतःचे स्थान बळकट रहावे यासाठी इंदिराजींच्या पुढेपुढे करण्यातच खर्ची पडले; उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्याबद्दल एका स्वपक्षीय आमदाराने मोठी तिखट प्रतिक्रिया नोंदली आहे. त्याच्या मते मुख्यमंत्री कायम वास्तव्यासाठी दिल्लीत असतात आणि अधून-मधून ते लखनौचा दौरा करतात !!

आसन टिकवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या खेपा ज्याप्रमाणे वाढत होत्या त्याचप्रमाणे त्यांची उचलबांगडी करण्यासाठी सरसावलेली मंडळीही दिल्लीमध्ये येत होती. कधी दिल्लीत बसून अशा राजकारणाला खतपाणी घालणाऱ्या आपल्या नेत्याला ही मंडळी भेटत होती, तर कधी तक्रार अर्ज घेऊन थेट इंदिराजींकडे धाव घेतली जात होती. आपल्यामागे किती सामर्थ्य आहे याचे प्रदर्शन व्हावे या हेतूने असंतुष्ट मंडळींची नेतेमंडळी आमदारांचे ताफे घेऊन इंदिराजींना भेटत होती. अनेक राज्यातून अशा स्वरूपाची अंतर्गत स्पर्धा सुरू झाल्यावर काही तरी निर्णय घेणे जरूर होते. प्रथम इंदिराजींनी अंतर्गत संघर्ष थांबवण्याचे आवाहन केले. मंडळींनी तिकडे सोइस्करपणे कानाडोळा केला आणि ही पक्षांतर्गत साठमारी चालू राहिल्यावर हे कोठे तरी थांबवले पाहिजे अशा निर्णयाप्रत येऊन इंदिराजींनी पक्षाच्या सरचिटणीसांना त्याप्रमाणे सूचना दिल्या. निदान आणखी काही काल तरी आहेत तेच मुख्यमंत्री सत्तास्थानी ठेवायचे आणि त्याना पूर्ण पाठिंबा द्यायचा असे धोरण निश्चित करण्यात आले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अब्दुल रेहमान अंतुले आणि तेव्हाच्या पक्षाध्यक्षा श्रीमती प्रेमलाताई चव्हाण याच्यामधील संघर्ष तुटेपर्यंत ताणला गेल्यावर काकींना खुर्ची खाली करण्याचे आदेश देण्यात आले. गुंडुराव हे कर्नाटकाचे पहिले ब्राह्मण मुख्यमंत्री. संजयच्या आशीर्वादाने त्याना ही खुर्ची लाभली आणि त्याच्याच आशीर्वादाने जगन्नाथ पहाडियासारखा पहिला हरिजन मुख्यमंत्री मिळाला आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपदी अल्पसंख्य मुस्लिम जमातीचे अंतुलेजी आले तेही संजयने आपला पाठिंबा निश्चित केल्यावरच ! मध्यप्रदेशसाठी अर्जुनसिंग ही जशी संजयची निवड त्याचप्रमाणे एकमुखी ठरावाने उत्तरप्रदेशाचे नेतृत्व संजयला बहाल करणाऱ्या कॉंग्रेस आमदाराना विश्वनाथ प्रतापसिंग याचे नेतृत्व स्वीकारण्यासाठी प्रवृत्त केले तेही संजयनेच. आणि तेही स्वत.च्या मुलासाठी मुख्यमंत्री पदाची स्वप्ने पाहणाऱ्या कमलापती त्रिपाठी यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याच्या रागालोभाची पर्वा न करता. अर्थात संजयच्या नावाची जादूच त्या वेळी अशी जबरदस्त होती की, विधानसभेचे सभासद नसलेल्या आणि ३०६ पैकी २५० आमदार ज्याला एकदाही भेटलेले नाहीत अशा विश्वनाथ प्रतापसिंग याच्या नावाची संजयने केलेली शिफारस आमदारमंडळींनी गोड मानून घेतली.

संजयने विविध राज्यांच्या मुख्यमंत्रिपदासाठी ज्या मंडळींची निवड केली तो मंडळी मुख्यमंत्रीपदी विराजमान झाली. संजय यात होता तोपर्यन्त सगळे कसे चिडीचिप होते; परंतु त्याचे निधन होताच त्याने निवड केलेल्या मुख्यमंत्र्याना असलेल्या विरोधाला खरे उधाण आले. संजय जिवंत असेपर्यंत मध्यप्रदेशात अपराध्यागत फिरणारे केंद्रीय मंत्री व्ही. सी. शुक्ला एकदम आक्रमक बनले. आपल्या गटाचे आमदार एकत्र करून त्यांनी अर्जुनसिंग याच्याविरुद्ध आवाज उठवण्याचे आवाहन त्याना केले. अर्जुनसिंग यांच्याविरुद्ध असलेल्या अनेक तक्रारींचा खलिता घेऊन मंडळी दिल्लीत आली. इंदिराजी त्याना भेटल्या. त्याचे म्हणणे ऐकून घेतले; परंतु एका शब्दाने प्रतिक्रिया व्यक्त केली नाही आणि पुढे या प्रकरणी पुढाकार घेणाऱ्या इदुरिया याचे पक्षसंघटनेमधील पद काढून घेण्यात आले; विद्याचरण शुक्ला याच्या पाठिंब्यावर इदुरिया दंड थोपटून उभे होते; तेच आडवे झाल्याने बाकीची मंडळी काय समजायचे ते समजून गेली. पी. सी. सेठी हे

प्रथम अर्जुनसिंग याच्या विरोधात बोलत होते; परंतु वारे कोणत्या दिशेने वहात आहे हे लक्षात आल्यावर त्यानी आपला आवाज सध्या तरी एकदम बद ठेवला आहे. इदुरिया याच्याविरुद्ध अशी काही टोकाची कारवाई केली जाईल, असे काही कोणाला वाटले नव्हते. त्यामुळे मध्यप्रदेशात या निर्णयाचे तीव्र प्रतिसाद उमटले आणि अर्जुनसिंग याना असणारा विरोध एकदम बोथट झाला.

कवळ चार मत्री घेऊन काम करणाऱ्या जगन्नाथ पहाडिया याना दिल्लीत बोलावून घेऊन समज देण्यात आली असून त्यानी आपले मत्रिमडळ तातडीने पूर्ण करावे असे आदेश देण्यात आले आणि त्याची तातडीन अमलबजावणीही झाली. याउलट त्रेसष्ट मत्री घऊन आध्रप्रदेश अक्षरशः मत्रिमडळमय करणाऱ्या अंजय्या याना केवळ ४४ मत्री घेऊन कारभार मार्गी लावण्याचा परवाना देण्यात आला.

कर्नाटकचे गुडुराव याच्या विरोधात महसूलमंत्री एस्. बगारप्पा यानी जोरदार आघाडी उघडली होती. आपल्याला केंद्रीय नेत्याचा पाठिंबा मिळल अशी त्याची अपेक्षा होती; परतु गुंडुराव याना बगाप्पा नको असतील तर त्याना जावे लागेल, असे वसतदादा पाटील यानी बोलून दाखवले आणि पधरा दिवसात बगारप्पाचे मत्रिपद गेले !

आपण निवडलेल्या मुख्यमत्र्याना निदान आणखी काही काळ तरी निर्वेधपणे काम करू द्यायचे असा निर्णय घेतला गेल्यामुळेच पक्षातर्गत विरोधाची धार काहीशी बोथट झाली आहे. इदिराजीकडून सध्या समर्थन मिळणार नाही लक्षात आल्यानेच विरोधी आघाडी उघडू पाहणारी मडळी नरम पडला आहेत. याचा अर्थ सर्व काही आलबेल आहे असा मात्र नव्हे. केंद्रीय मत्रिमडळामध्ये राज्यस्तरावरील मत्रिपद भूषवणाऱ्या शला कौल या इदिराजीच्या आप्तही आहेत. विश्वनाथ प्रतापसिग याचा उचलबागडी करून लवकरच तेथे शैला कौल याना आणण्यात येणार असल्याच्या बातम्या आहेत. आध्रप्रदेशचे मुख्यमत्री अजय्या याचे आसन सध्याच्या वावटळीमधून बचावले असले तरी अजय्या याची स्वारी मुख्यमत्रिपदाची खुर्ची आणखी किती काळ साभाळू शकेल याबद्दल अनेक जाणकार साशक आहेत. आंध्रप्रदेशात प्रभावी असलेल्या कामा जमातीमधील एन्. भास्करराव याना लवकरच अजय्या याच्या जागी आणले जाईल, असे बोलले जाते. तथापी एखाद-दुसऱ्या राज्याचे मुख्यमत्री अशा पद्धतीने बदलताना बडखोरीमुळे अथवा त्याच्याविरुद्ध असलेल्या तक्रारीमुळे त्याना मुख्यमत्रिपदावरून दूर करण्यात यत आहे, अशी भावना बळावली जाणार नाही अशी दक्षता घेऊनच हे एकदोन बदल करण्यात येतील. अजय्या याना एखाद्या राज्याचे राज्यपालपद बहाल करण्यात येईल तर विश्वनाथ प्रतापसिंग याची केंद्रीय मत्रिमडळामध्ये वर्दी लावण्यात येईल.

इदिराजीच्या हाती प्रचड सत्ता असली तरी ती चागल्या प्रकारे राबवली जायची असेल तर राज्यामधील मंत्रिमडळे सुस्थिर पायावर उभी असलीच पाहिजेत, हा विचार निश्चित करून ज्याची आसने डळमळित झाली होती अशा अनेक मुख्यमत्र्याना टेकू देण्यात आले आहेत. राज्यामधील मत्रिमडळे स्थिरावल्यावर आता केंद्रस्थानी महत्त्वपूर्ण डागडुजी करण्याची तयारी सुरू झाली असून अनेक महत्त्वाच्या मत्र्याचा खाता बदलला जाण्याची शक्यता आहे. परराष्ट्रमंत्री पी. व्ही. नरसिंहराव आणि गृहमंत्री झैलसिंग यांच्या कामगिरीबद्दल इदिराजी समाधानी नाहीत. त्याचे अवमूल्यन केले आहे असे वाटू नये, परंतु खातेबदल करून आपली नाराजी व्यक्त करावी असा इदिराजीचा मानस आहे. यशवतराव चव्हाण शक्तिशाली असताना स्वत.च्या मनाप्रमाणे त्याची खाती बदलणाऱ्या इंदिराजी, आज सर्व शक्तिमान असताना झैलसिंग किंवा नरसिंहराव याच्यासारख्यांची खाती बदलण्यास जराही मागेपुढे पहाणार नाहीत; पण बदल करायचा म्हटले तरी माणसे आणायची कुठून असा याच्यापुढे प्रश्न आहे. ☐

## ☐ अशांत अहमदाबाद—एक प्रतिक्रिया

अहमदाबाद अशात असताना माझे एक अत्यत जवळचे नातेवाईक अहमदाबादला आपल्या मुलाकडे गेले होते. चार दिवस मजेत रहावे आणि परत यावे असा त्याचा विचार होता. राखीव जागांविरुद्ध विद्यार्थ्यांनी जे समेलन उभारले ते प्रखर असताना ते अहमदाबादमध्ये राहिले होते आणि उघड्या डोळ्यानी घडणाऱ्या घटना पहात होते. ते परत आल्यावर त्याची गाठ घेतली. त्यानी नोदलेली मते नोदण्यापूर्वी एक गोष्ट स्पष्ट करणे जरूर वाटते. कोणत्याही राजकीय पक्षाशी त्याची तशी बांधिलकी नाही आणि दलितांबद्दल त्याना सहानुभूती आहे. असे असूनही अशात अहमदाबादबद्दलची त्याची पहिली प्रतिक्रिया अशी की, दलिताचे प्रश्न हे प्रायः आर्थिक–सामाजिक स्वरूपाचे असले तरी हे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी ज्या मडळीवर असते ती मडळी आणि ते पक्ष केवळ राजकीय दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पहातात. आदोलन करणाऱ्या मडळीचे नेमके म्हणणं काय ? त्याना त्याच्या दलित बांधवाबद्दल काय वाटते ? कितीही हुशारी दाखवली आणि गुणाचा पाऊस पाडून दाखवला तरीही मनाजोगती करिअर करता यत नाही, यामुळे त्यांना किती निराशा येत असेल ? यासारख्या प्रश्नाचा विचार करायलाच राजकीय नेते तयार नाहीत. सत्तास्थानी असलेल्या इदिरा काँग्रेसपासून ते डाव्या कम्युनिस्टापर्यंत सर्व पक्ष डोळ्याला झापड लावून चालतात, असा सर्वसाधारण नागरिक म्हणून त्याचा आक्षेप आहे. ते म्हणाले, 'अहमदाबादमध्ये हिंडत असताना दलित आणि दलितेतर याच्यामध्ये अकारण कटुता असल्याचे मला जाणवले. राखीव जागाविरुद्ध आवाज उठवणाऱ्याचा जागा राखीव ठेवण्यास विरोध नाही. आपल्या दलित बाधवाबद्दल त्याना सहानुभूती आहे.'

राखीव जागाचे जे प्रमाण असते त्याबाबत मात्र ही मंडळी असमाधानी आहेत. गुणवत्तेमध्ये आमच्याशी बरोबरी करा असे त्यांचे म्हणणे नाही. ज्या सकटाशी मुकाबला करत दलित शिक्षण घेतो, त्याचे कौतुक असूनही, गुणवत्तावादावर अग्रभागी असलेल्या मंडळीचाही जर कोंडमारा होत असेल तर तसे आम्ही साधे बोलूनही दाखवायचे नाही का, अशी पृच्छा एका विद्यार्थ्याने माझ्या नातेवाइकाजवळ केली. तो म्हणाला, एन्. बी. बा. एन्. कान, नाक, घसा याबाबत पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी तीन जागा आहेत. या तीनच्या तीन हरिजन आणि वन्य जमातीसाठी राखीव. म्हणजे

कितीही गुण मिळवले तरी जाती–जमातीचा फायदा मिळू न शकणारा उच्च वर्णीय उच्च शिक्षण घेण्यास अपात्र ! दुसऱ्या विभागात तीन जागा आहेत त्यापैकी दोन राखीव. आता आमचे नशीब म्हणून अजून तिसरी जागा तरी गुणवत्तेवर पुढे येणाऱ्या विद्यार्थ्याला मिळू शकते. दुसऱ्या एका विद्यार्थ्याचे मत असे की, जागा राखीव ठेवावी; परंतु राखीव जागेसाठी उमेदवार पुढे येत नसतील तर त्या जागा मोकळ्या करून निदान त्या वर्षी तरी त्या गुणवत्ता-यादीवर अग्रस्थानी असलेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाव्यात पुढच्या वर्षी राखीव क्षेत्रातून विद्यार्थी आले तर अर्थात त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

अहमदाबादमधील एका हॉस्पिटलमध्ये काम करणारा एक डॉक्टर म्हणाला, हॉस्पिटलमध्ये दंतवैद्याच्या पाच जागा आहेत. त्या पाचच्या पाच जागा राखीव याच विभागामधील पदव्युत्तर शिक्षण घेतलेला विद्यार्थी उपलब्ध नाही. म्हणून जागा भरलेली नाही. कारण जागा राखीव, सर्वसाधारण विद्यार्थी अजूनही थंड डोक्याने विचार करताना दिसतो. त्याच्याजवळ सांगण्यासारखे असते; पण ते ऐकून घ्यायलाच कोणी तयार नसतो. राखीव जागांचे प्रमाण काही तरी तारतम्य दाखवून निश्चित करा, अशी मागणी करणारा विद्यार्थी जातीय ठरतो.

## दंगल अशी भडकत जाते

बारीकसारीक कारणावरूनही दंगल कशी भडकते याचे प्रत्यक्ष वर्णन माझ्या या नातेवाइकाच्या तोंडून ऐकायला मिळाले. काही कामानिमित्त बसने जाणे जरूर असल्याने ते लाल दरवाजा या मुख्य बसस्थानकावर गेले होते. वेळ गर्दीची होती आणि शाळा व कॉलेजात जाणारे अनेक विद्यार्थी बससाठी उभे होते. कोठे तरी दंगल झाल्याचे वृत्त आले आणि स्थानकप्रमुखाने एकही बस सुटणार नाही असे सांगितले. आता काय करावे ? कॉलेजात कसे जावे, का सरळ घरी जावे अशा स्वरूपाची चर्चा विद्यार्थी आपआपसात करत होते. विद्यार्थ्यांची गर्दी पांगायलाही सुरुवात झाली होती. तेवढ्यात काठ्या आपटत पोलीस आले. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही स्वरूपाची आगळीक झालेली नव्हती आणि ज्या प्रकारे विद्यार्थी काढता पाय घेत होते त्यावरून पाच-दहा मिनिटात बसस्टॉप रिकामा झाला असता; पण पोलिसानी आक्रमक धोरण स्वीकारले. निघू लागलेल्या विद्यार्थ्यांना त्यानी हात धरून बाहेर काढले. सारा प्रकार माझ्या नातेवाइकाच्या डोळ्यासमोर होत असल्याने मंडळी असे का वागतात हे त्याना समजूच शकत नव्हते. पोलिसानी आक्रमक धोरण स्वीकारल्याने. विद्यार्थीही थोडेफार बिथरले; परंतु सुदैवाने मोठ्या दंग्यात त्याचे रूपांतर झाले नाही.

हा सारा तपशील मला सांगणाऱ्या श्री. भिडे याना खरा चमत्कारिक प्रकार तर पुढेच पहावयास मिळाला. लाल दरवाजा बसस्थानकावरून ते बाहेर पडले आणि रेल्वेस्टेशनच्या दिशेने जाऊ लागले थोडे-फार चालून गेले असतील-नसतील तोच मागून थोडाफार गलका ऐकू आला म्हणून ते बाजूला उभे राहिले. आपली पुस्तके वगैरे घेऊन एक विद्यार्थी शांतपणे येत होता. किंबहुना त्याच्या हातामधील पुस्तकामुळे आणि चेहऱ्याच्या कोवळेपणामुळे त्यांना तो महाविद्यालयात पहिल्या–दुसऱ्या वर्षाचे शिक्षण घेणारा विद्यार्थी वाटला. दोघे पोलीस त्या मुलाला दरडावत होते आणि तो बिचारा घाबरल्या आवाजात ‘अहो, मी लाल दरवाजा येथे बस पकडण्यासाठी गेलो होतो, बस सुटली नाही म्हणून आता परत चाललो आहे’ असे सांगत होता. त्याचे म्हणणे पटण्यासारखे होते. असे असूनही त्याला धमकावणी देऊन सोडले असते तर ते समजण्यासारखे होते; पण ‘कुछ नही, सब बकवास है !’ असे म्हणत लाठीचे दोन तडाखे त्याच्या पायावर हाणले. त्याच्या हातामधील पुस्तके खाली पडली. आपल्याला का मारत आहेत हेच त्याच्या लक्षात येत नसल्याने त्याच्या चेहऱ्यावर मोठे विचित्र भाव जमा झाले होते. ‘सारा प्रकार माझ्या डोळ्यादेखत घडला असूनही मी काही करू शकलो नाही. बाजूने जाणाऱ्या इसमाने मी का उभा आहे अशी पृच्छा करून मला तेथून जाण्याचा सल्ला दिला. मी काढता पाय घेतला खरा; परंतु त्या विद्यार्थ्याचे नेमके चुकले काय ते मला समजू शकले नाही’ असे भिडे मला सांगत होते.

दलित मंडळी ही आपल्या समाजाचा एक घटक आहेत. पिढ्यान पिढ्या त्यांच्यावर अन्याय होत असल्याने सर्व समाजाने त्याची दखल घेणे जरूर आहे; पण ज्या पद्धतीने दलिताचे राजकारण खेळवले जात आहे तो साराच प्रकार निषेधार्ह वाटतो. दलित आणि दलितेतर असे वळण लागणे खचित हितावह नाही; पण दुर्दैवाने नेमके तसेच काही होत आहे अहमदाबाद दंगलप्रकरणी पुण्यात शिवाजीमंदिरमध्ये एक सभा झाली होती. सर्व पक्षाचे मान्यवर नेते व्यासपीठावर होते. जमलेल्या समाजावरून मी नजर फिरवली. जवळजवळ सर्व मंडळी दलित समाजामधील. सभा शिवाजीमंदिरमध्ये. व्यासपीठावर एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे याच्यासारखे वक्ते. मग अशा सभास्थानी विशिष्ट समाज जमा होतो आणि व्यासपीठावरील नेते राजकीय हिशेब डोळ्यासमोर ठेवून भाषणे करतात. या दोन्ही गोष्टी मला चांगल्याच खटकल्या. जागा राखीव ठेवण्याचा प्रकार हा एक आवश्यक उपाय आहे याबद्दल कोणताही संदेह नाही, पण त्याचे प्रमाण मात्र जरूर वादग्रस्त झालेले आहे. आज जे अहमदाबादमध्ये होत आहे त्यातही राग आहे तो राखीव जागाच्या अवाजवी प्रमाणाबद्दल. बिहारमध्ये कर्पुरी ठाकूर यांच्या कारकीर्दीत राखीव जागाचे प्रमाण असेच वाढवण्यात आले आणि दलितेतर रस्त्यात उतरले. या प्रश्नाबाबत ऐक्याची भूमिका घेऊन चालणार नाही तसेच केवळ राजकीय दृष्टीनेही या प्रश्नाचा विचार करणे हितावह नाही. आज या प्रश्नाची सोडवणूक करण्याची जबाबदारी ज्या मंडळीवर आहे ती सत्ताधारी मंडळी आणि ज्याच्या हाती सत्ता नाही अशी अन्य विविध पक्षाची राजकीय मंडळी केवळ मतांच्या हिशेबात या प्रश्नावर बोलताना दिसतात. दलितांना न्याय्य सवलती मिळाल्याच पाहिजेत, नव्हे तो त्याचा हक्क आहे आणि दलितेतरानी उपकाराची, दयेची, सहानुभूतीची भावना जराही न बाळगता हा हक्क मान्य केला पाहिजे. तसा तो होतानाही दिसतो; पण या हक्कालाही ज्या मर्यादा पडतात त्या जर फाजील उत्साहाच्या भरात तोडल्या गेल्या तर त्यातून हमखास वातावरण तापते, दंगली उसळतात आणि म्हणूनच दलिताच्या हक्काचे संरक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यानी नाण्याच्या दुसऱ्या बाजूवरही लक्ष ठेवले पाहिजे. □

# दलित समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र प्रतिष्ठान व्हावे

## सहकार भारती परिसंवाद

'आजच्या परिसंवादात, दलिताचे प्रश्न सोडविण्यासाठी, विशेषत: दलितांच्या सस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी, मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य करण्यासाठी वेगळे प्रतिष्ठान असावे ही कल्पना नव्याने पुढे आली, ती अत्यंत स्वागतार्ह आहे असे प्रतिष्ठान स्थापन करण्याचे प्रयत्न झाले तर मी त्यासाठी संपूर्ण सहकार्य देईन आणि असे प्रतिष्ठान स्थापन होणे हे आजच्या परिसंवादाचे सर्वांत मोठे यश ठरेल,' असे विचार महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सभापती व रोजगार हमी मंडळाचे अध्यक्ष श्री. वि. स. पागे यानी सागलीमध्ये बोलताना नुकतेच व्यक्त केले.

'सांगली जिल्हा सहकार भारती' या संस्थेच्या वतीने 'दलित समस्या व सहकारी चळवळ' या विषयावर घेण्यात आलेल्या परिसंवादाचा समारोप करताना प्रमुख पाहुणे म्हणून श्री. वि. स. पागे बोलत होते.

हा परिसंवाद मंगळवार दिनाक १७ फेब्रुवारी '८० रोजी सागली नगरवाचनालयाच्या सभागृहात घेण्यात आला प्रारंभी सांगली जिल्हा सहकार भारतीचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब पुजारी यांनी स्वागतपर भाषण करून, सहकार भारती या नव्याने स्थापन झालेल्या संस्थेची माहिती व श्री. पागे याचा परिचय करून दिला. सहकार भारती या संस्थेच्या कल्पनेचे जनक व महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री. माधवराव गोडबोले हे परिसंवादास उपस्थित राहिले, तसेच खास निमंत्रित म्हणून औरंगाबादचे नामांतरवादी कृती समितीचे अध्यक्ष श्री. बापुराव जगताप, मुबईचे दलित पँथरचे अध्यक्ष प्रा. अरुण कांबळे, सेक्रेटरी रामदास आठवले हे उपस्थित राहिले त्याबद्दल त्याचे स्वागत केले. शिवाजी विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळाच्या पुरस्काराने हा परिसंवाद घेण्यात आला होता.

समारोपप्रसंगी श्री. वि. स. पागे पुढे म्हणाले, 'आजचा परिसवाद हा खऱ्या अर्थाने परिसवाद झाला आहे दलितांच्या समस्याचे अनेक नवे दृष्टिकोन व सर्व पैलू या परिसंवादात मांडले गेलेत. दलितांचे सर्वच आर्थिक प्रश्न केवळ सहकारी चळवळीच्या माध्यमातून सुटणार नाहीत; परंतु सहकारी चळवळीतून आर्थिक प्रश्न सुटण्यास सुरुवात होते, त्यामुळे सहकारी चळवळीचा आधार घेण्यास हरकत नाही. यावर परिसंवादात एकमत झाले. केवळ आर्थिक प्रश्न सुटल्याने दलिताच्या सामाजिक समस्या मात्र सुटणार नाहीत. सामाजिक समस्या या बऱ्याच जुनाट व खोलवर रुजलेल्या आहेत, त्यामुळे यासाठी सामाजिक पातळीवरच लढे द्यावे लागतील.'

प्रा. अरुण काबळे यांनी भारतीय संतांवर टीका केली होती. त्याचा उल्लेख करून श्री. पागे म्हणाले, 'संतांना सामाजिक विषमतेची चीड होती व खत होती. त्यांच्या काळात जे शक्य होते त्यानुसार संतांनी आपली चीड अत्यंत कठोर शब्दात व्यक्त केली आहे. ज्ञानेश्वराचा काळ आपण लक्षात घेतला पाहिजे, तसाच डॉ. बाबासाहेब आबेडकराचा काळही आपण लक्षात घेतला पाहिजे. आज काळ बराच पुढे गेला आहे, त्याचे भान आपण ठेवले पाहिजे. संतांनी आपल्या संपूर्ण वाङ्मयात समतेचे सूत्र कुठेही सोडलेले नाही. अनिष्ट रूढी व परंपरा याविरोधी लढे देऊन आपण विज्ञाननिष्ठ बनले पाहिजे. विशेषत: भारतात अनेक भटक्या जमाती आहेत. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून सोडण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक झाले पाहिजेत. समतेचा झेंडा घेऊन जे आमच्याबरोबर राहतील ते सर्व आमचे; समतेच्याविरोधी राहतील ते आमचे विरोधी, या सूत्रानेच आपल्याला दलितांचे प्रश्न सोडविता येतील. निदान माझी तरी भूमिका अशीच आहे. कालानुसार मूल्ये बदलतात. आजच्या काळात आपल्याला अधिक विज्ञाननिष्ठ व बुद्धिनिष्ठ बनले पाहिजे.'

### परिसंवादाचे निष्कर्ष

दिवसभर झालेल्या परिसंवादाचे निष्कर्ष सांगताना श्री. पागे म्हणाले—

१. दलितांना आर्थिक स्वयंपूर्णता आल्यावर त्याचे सामाजिक, शैक्षणिक व सास्कृतिक प्रश्न सोडविणे सोपे जाते, हे म्हैसाळने सिद्ध केले आहे. परंतु दलितांचे सर्वच प्रश्न सहकारी संस्थाच्या माध्यमातून सुटणार नाहीत. हे प्रश्न सोडविण्यास सहकारी संस्थाच्या माध्यमातून सुरुवात मात्र करण्यास हरकत नाही.

२. दलितांच्या सहकारी संस्थाचे नेतृत्व दलितानीच करावे; परंतु प्रारंभी संस्था मार्गी लागेपर्यंत बाहेरून मदत घेण्यास हरकत नाही.

३. स्वत: घरात कसण्याइतके मोठे क्षेत्र असेल तरच दलितांनी शेती स्वत: कसावी. अन्यथा सामुदायिक सहकारी शेतीसंस्थाच स्थापन कराव्यात.

४. अशा प्रकारे दलितांच्या गावोगावी होणाऱ्या शेती सोसायटया स्वतंत्र असाव्यात. त्यामुळे एखादी सोसायटी अयशस्वी ठरली तरी तिचे परिणाम सर्व चळवळीवर होणार नाहीत.

५. शेती सोसायटया नोंद करू नयेत असा कायदा झालेला नाही; परंतु सरकारचे तसे धोरण आहे. त्यामुळे अशा सोसायटया नोंद करताना येणाऱ्या अडचणी, त्याना मिळणारी मदत वगैरे अडचणी दूर करण्यासाठी मी शासनामध्ये प्रयत्न करीन.

श्री. पागे शेवटी म्हणाले, 'लिंगायत धर्माचे संस्थापक श्रीबसवेश्वर हे एका राज्याचे पतप्रधान होते. त्यानी आतरजातीय विवाह

केला; त्यामुळे मुलीच्या आई-बापाचे खून झाले. राजाचाही खून झाला व बसवेश्वराना पंतप्रधानपद सोडावे लागले. संतानी या विषमतेविरुद्ध चीड व्यक्त केली; परतु ते परिस्थितीमुळे बंड करू शकत नव्हते. सामाजिक विषमतेचा लढा हा सनातन लढा आहे हा लढा आपण जर यशस्वी केला नाही तर भारतोय समाजजीवनाच्या चिध्याचिंध्या होतील. एका उपेक्षित पण महत्त्वाच्या प्रश्नावर आज परिसंवाद आयोजित केला याबद्दल मी संयोजकाना धन्यवाद देतो.'

## सहकारातून विकास व विकासातून समन्वय

'दलित समस्या व सहकारी चळवळ' हा परिसंवाद मुख्यत श्री मधुकर देवल याच्या म्हैसाळ पद्धतीच्या प्रकल्पाचे पार्श्वभूमीवर सहकार भारतीने घेतला होता. म्हैसाळ–नाद्रे–कवठेपिरान इत्यादी प्रकल्पाची पार्श्वभूमी व त्यातून निर्माण झालेल्या समस्या यावर परिसवादाच्या प्रारंभी श्री मधुकर देवल यानी विस्तृत भाषण केले. श्री. देवल म्हणाले, '' नवा मनुष्य घडविणे हा उद्देश धरून दलिताचे म्हैसाळ पद्धतीचे प्रकल्प आम्ही गेली दहा वर्षे राबवीत आहोत. असे प्रकल्प राबविण्यात अनेक अडचणी आहेत. या समस्यांचा समाजातील सर्व थरातील विचारवंतानी अभ्यास करावा व मार्गदर्शन द्यावे यासाठी हा परिसंवाद आहे. संघर्षाऐवजी सहकारातून विकास व विकासातून सामाजिक समन्वय अशा मार्गाने पुढे जाता येईल का, ही मास मुव्हमेंट होईल का, याचा शोध घेतला जावा. म्हैसाळ पद्धतीच्या प्रकल्पाचे हे सहकारी चळवळीसमोरील आवाहन आहे.' श्री. देवल याच्या भाषणानतर म्हैसाळच्या श्री विठ्ठल सह. शेती सोसायटीचे चेअरमन श्री. आर्. डी. कांबळे यानी आपले दहा वर्षातील अनुभव कथन केले.

यानतर परिसवादात पुढील वक्त्याची भाषणे झाली.

---

## साप्ताहिक माणूस

मालकी व तत्संबधित इतर तपशिलाचे निवेदन

( अधिनियम ४, नियम ८ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| १ प्रकाशन स्थळ | : | पुणे |
| २. प्रकाशन काल | : | साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | } | श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव पेठ<br>पुणे ४११ ०३०. |
| ४. नागरिकत्व | : | भारतीय |
| ५. प्रकाशन सस्थेचे नाव व तिच्या मालकाचे नाव व पत्ता | } | राजहंस प्रकाशन<br>श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव पेठ<br>पुणे–४११ ०३०. |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

दिनाक ५ मार्च १९८१ प्रकाशकाची सही

श्री. ग. माजगावकर

---

**श्री. संपतराव पाटील ( भूविकास बँकेचे माजी अध्यक्ष )**

'म्हैसाळ प्रकल्प हा एक चागला व दलितांना उपकारक प्रकल्प आहे; परंतु या प्रकल्पाची 'मास मुव्हमेंट' होऊ शकणार नाही. आज तसे वातावरणही नाही. यासाठी जिथे निसर्ग अनुकूल आहे अशी दलिताची वेचक ठिकाणे निवडा व त्या ठिकाणी दलितसंस्था उभ्या करा. अशा वेचक प्रयत्नातून दलितसंस्थांची सुदर सरोवरे निर्माण होतील व मग काळानुसार त्याचा प्रसार वाढेल.'

दलितांच्या सहकारी संस्थाची अर्थरचना या विषयावर श्री. संपतराव पाटील बोलत होते. ते पुढे म्हणाले, 'महाराष्ट्र सरकार, केंद्र सरकार व जागतिक बँक यांच्या दप्तरी दलितांच्या विकासाच्या अनेक योजना आज पडून आहेत. सहकारी चळवळीतून विश्व निर्माण करता येते, परंतु ध्येयवादाने प्रेरित होऊन काम करणारा कार्यकर्ता-वर्ग नसेल तर अशा योजना यशस्वी होणार नाहीत. म्हणून माझी शासनाला, अर्थसंस्थाना व बँकाना अशी विनंती आहे की, त्यांनी कोसबाडचे डॉ. जयंतराव पाटील, श्री. मधुकर देवल अशा कार्यकर्त्यांना संघटक म्हणून अगर प्रवर्तक म्हणून आपल्या योजनांत समाविष्ट करून घ्यावे व त्याना प्रतिष्ठा निर्माण करून द्यावी. त्यातूनच दलित विकासाच्या योजना मार्गी लागतील.'

'सहकारी शेती सोसायटीची कायद्याची चौकट फार जुनी झाली आहे. ही कायद्याची चौकट काळानुसार बदलली पाहिजे', असे मत व्यक्त करून श्री. संपतराव पाटील म्हणाले, 'दलितांच्या सहकारी संस्था या एकच घटक समजून अशा संस्थाना ४ टक्के या सवलतीच्या दराने कर्ज मिळाले पाहिजे. किंबहुना दलिताच्या शेती सोसायट्या हा 'स्वयंरोजगार' समजून अशा संस्थांना विनव्याजी कर्ज देण्याची योजना शासनाने केली पाहिजे. दलितांच्या निरनिराळ्या सहकारी संस्था स्थापन व्हाव्यात व त्यांना चांगले मार्गदर्शन लाभावे यासाठी पुढाकार घेणारी संस्था म्हणून (स्पॉन्सरिंग एजन्सी) 'स्वतंत्र प्रतिष्ठान' स्थापन व्हावे. जरूर तर कायद्यात बदल करून असे प्रतिष्ठान स्थापले जावे, असे माझे ठाम मत आहे. असे प्रतिष्ठान स्थापन झाले तर दलितांची लुबाडणूकही थाबेल !'

**प्रा. भा. दा. केळकर (वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग)**

शेतीखेरीज दलित समाजाला अन्य कोणते उद्योग पुरविता येतील, या विषयावर बोलताना प्रा. केळकर म्हणाले, 'ज्याचे तंत्रज्ञान सोपे आहे व जे उद्योग ग्रामीण भागात करता येतील अशा अनेक उद्योगाची संशोधने झालेली आहेत; परंतु हे सर्व संशोधन दिल्लीच्या एन. आर. डी. सी. ए. या संस्थेत अगर म्हैसूरच्या फूड रिसर्च संस्थेत अडकून पडले आहे. हे तंत्रज्ञान मध्यस्थ संस्थानी दलितापर्यंत नेले तर त्याचा उपयोग फार चांगला होईल.' अंड्यांवरील प्रक्रिया, केळीवरील प्रक्रिया अशी अनेक उदाहरणे सागून प्रा. केळकर म्हणाले, 'पात्र असे लघुउद्योग सहकारी संस्थेमार्फतच केले पाहिजेत असे बंधन असण्याची जरुरी नाही. व्यक्तिगत, भागीदारी अगर प्रायव्हेट लि. अशा कोणत्याही पद्धतीने हे उद्योग चालू केले जावेत'

**प्रा. अरुण कांबळे (अध्यक्ष, दलित पँथर, मुंबई)**

'भारतामध्ये दलिताचे दोन प्रकार आहेत. एक आर्थिक दलित व दुसरे सामाजिक दलित. आम्ही सामाजिक दलित आहोत. आम्हाला

आर्थिक दलितांबरोबर गुंतवून घेण्यास आम्ही तयार नाही. आम्ही भारतीय, वैयक्तिक पातळीवर पुरोगामी आहोत, पण सामुदायिक पातळीवर प्रतिगामी आहोत. म्हैसाळ प्रकल्प चांगला आहे; पण म्हैसाळ प्रकल्प ही एकमेव मात्रा नव्हे. सामाजिक दलितांमध्ये महार आहेत, चांभार आहेत, मातंग आहेत, इतर अनेक पोटजाती आहेत. म्हैसाळ पद्धतीचे प्रकल्प राबविण्याचे ठरविले तर अशा सोसायट्या फक्त महार समाजापुरत्या होतील. मग इतर दलित समाजाचे काय ? तरी पण शासनाने महारकी वतन जमिनीच्या विकासाची योजना हाती घ्यावी. दलित सोसायट्या या दलितांच्याच वेगळ्या व्हाव्यात व त्यांचे नेतृत्व दलितांकडेच असावे. डॉ. आंबेडकर म्हणत, भारतात दोन भारत आहेत एक भारत व दुसरा बहिष्कृत भारत. हे दोन भारत एकत्रित-एकरस होणार आहेत का ? आम्ही नामांतरवादी चळवळ चालविली आहे. गुजरातमध्ये आज दलितांवर अत्याचार चालू आहेत. लक्षात ठेवा, ज्या दिवशी या देशातील राखीव जागा काढून घेण्यात येतील त्या दिवशी या देशात यादवी युद्ध चालू होईल ! कारण राखीव जागा ही आमच्यावर मेहरनजर नसून जुन्या काळात उच्चवर्णीय समाजाने केलेल्या अत्याचाराची भरपाई आहे.

'आम्हांला संयुक्त सह. शेती नको, मध्यस्थ नको, सर्व्हिस सोसायट्या चालतील. लोकशाहीवादी, बुद्धिप्रामाण्यवादी व समतावादी माणूस निर्माण करण्यासाठी भारतात चार वर्णांऐवजी एक वर्णव्यवस्था निर्माण करणारा माणूस आम्हांला घडवावयाचा आहे. आम्हाला केवळ आर्थिक उन्नती नको आहे.'

**श्री. रामदास आठवले (सेक्रेटरी, दलित पँथर, मुंबई)**

'*आम्हाला आजच्या राज्यात न्याय मिळत नाही. बँका दलितांना* कर्ज देत नाहीत. समतावादी समाज आम्हाला निर्माण करायचा आहे. या कामी आम्हाला सांगली जिल्हा सहकार्य देणार असेल तर आम्हीही जरूर सहकार्य करू.'

**प्रा. बापुराव जगताप (अध्यक्ष, नामांतरवादी कृति समिती, औरंगाबाद)**

'दलित समाज केंद्रबिंदू मानून सहकारी चळवळीत घेतला जाणारा हा पहिला परिसंवाद आहे. या परिसंवादाने दलित समाजाला नवे परिमाण लाभेल असे मला वाटते. त्यामुळे असा परिसंवाद आयोजित केल्याबद्दल मी प्रथम सहकार भारती या संस्थेला धन्यवाद देतो.

'आम्हाला अनेक जण प्रश्न विचारतात की असा संघर्ष किती दिवस करणार ? परंतु आम्हा दलितांना सहकारी चळवळीने आपल्यात सामील करून घेतले नाही, मग आम्ही काय करणार ? मी काल दिवसभर म्हैसाळ सोसायटी पाहिली. काम कुणी केले याला महत्त्व नाही; पण काम चांगले आहे. म्हैसाळमधील शोषितांची पत वाढली आहे, हे मला स्पष्ट दिसून आलं. आम्हाला केवळ आर्थिक उन्नती नको आहे. सामाजिक प्रतिष्ठा हे आमचे ध्येय आहे. साखरकारखानदारीचा आमच्या समाजाला कोणताही लाभ झालेला नाही. मराठवाड्यात नामांतरवादी आंदोलनात दलितांचे चिरेबंदी वाडेसुद्धा जाळले. बिहार-गुजरातमध्ये राखीव जागांविरुद्ध आंदोलने चालू आहेत. या सर्व विरोधात मी म्हैसाळ पद्धतीच्या प्रकल्पाचे स्वागत करतो; पण त्यावर आमचे भागणार नाही.'

प्रा. जगताप पुढे म्हणाले, 'नंदीवाले, अस्वलवाले, पारधी, गुन्हेगार जमाती यासाठी सहकारी चळवळीने काय केले ? रात्रीतून पारध्यांच्या वस्तीवरील सर्वांचे खून केले जातात. सहकारी चळवळ यासाठी काय करणार आहे ? बाबा आढावांनी एक गाव एक पाणवठा चळवळ केली; पण या भटक्या जमातीतले लोक मला विचारतात आम्हाला गावच नाही, तर पाणवठा कुठला ? याला उत्तर कोण देणार ?'

'या देशातल्या राखीव जागा रद्द होतील तो दिवस क्रांती अगदी जवळ आणणारा ठरेल,' असा इशारा देऊन श्री. जगताप म्हणाले, 'म्हैसाळ प्रकल्प चांगला आहे. आम्ही जिथे जाऊ तिथे अशा सोसायट्या स्थापन करण्याचा प्रयत्न करू; परंतु म्हैसाळ हे आमच्या समस्यांना अंतिम उत्तर नाही !

'श्री. पागेसाहेब, आपण समाजातले श्रेष्ठ आहात, ज्ञानी आहात, सहकारी चळवळीतील *जाणकार आहात, अनुभवी आहात. आम्ही* दलित आहोत, तरुण आहोत, आमचा सहकारी चळवळीचा अभ्यास कमी आहे; परंतु आम्ही तुमच्यापुढे खुल्या दिलाने आणि मोकळ्या हाताने उभे *आहोत. आमचे मोकळे हात संघर्षासाठी वापरावयाचे* की समन्वयासाठी वापरावयाचे, याचा निर्णय तुम्ही करावयाचा आहे. दलित समाजाला आपण प्रबोधन करता त्याचबरोबर उच्चवर्णीयानाही प्रबोधन केलेत तर बरे होईल. *आमचे हात समन्वयासाठी* वापरले जावेत असे आम्हाला वाटते; पण कसे वापरावे लागतील त्याचा निर्णय तुमच्यासारख्या समाजधुरीणांनी घ्यावयाचा आहे.'

प्रा. पी. जे. *ताम्हनकर, ॲड. चिमण लोकुर, श्री. पाटील* वगैरेंचीही या परिसंवादात भाषणे झाली. श्री. प्रभाकर ठाकूर यांनी आभार मानले.

या परिसंवादास सर्व *थरातील प्रमुख लोक, प्राध्यापकवर्ग,* वकील व दलित समाजातील तरुणवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

—वा. भा. पुजारी

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

श्यामचा संसार (कथा-३)

फिरोज रानडे

# अलबर्ट पिंटो का सिनेमा देखके अपने श्याम को घुस्सा क्यूँ आता है ?

कृपेचा मथळा अंमळ लांबडा झाला आहे हे खरेच. पण काय करणार ? जीवनाच्या बाकी सर्व क्षेत्रात तसेच चालले आहे. आजकाल राजकीय घोषणा-सिनेमाची नावे-सवंच आपली लाबडी होत चालली असल्या-कारणाने कथाचे मथळे सुद्धा लाबडे होणे सहाजिकच नाही का ?

पूर्वी कसे 'म. गाधी की जय' वा 'पं. नेहरू झिंदाबाद' एवढ्याच छोट्या-छोट्या घोषणा असत; पण आता कमीत कमी 'हमारी नेता–इंदिरा गांधी' एवढी तरी असतेच असते. बरे, विरोधी पक्ष तरी अशा लाबड्या घोषणाना विरोध करतो का ? नाव नको. उलट त्यांच्या घोषणा आणखी-नच लाबड्या असतात. परवा मुबईला भरलेल्या भाजपच्या अधिवेशनात ऐकलं, 'पंतप्रधान की अगली बारी-अटल बिहारी-अटल बिहारी !' आता विरोधी पक्षाचे नेते बारी-बारीने पंतप्रधान होतात हे तीन वर्षात दोन पंतप्रधान होऊन सिद्ध झालेच आहे म्हणा ! असो.

पूर्वी सिनेमाची नावे कशी सुटसुटीत असत नाही ? किस्मत-माणूस-शेजारी-बरसात-आनंद वगैरे वगैरे; पण आज-काल ?

एका गुरुवारी श्याम कचेरीतून घरी आला तर राधाने त्याला प्रथम काय सागितले असेल तर 'आजच्या आज अलबर्ट पिंटो को घुस्सा क्यूं आता है ह्या सिनेमाची तिकिटे घेऊन या !' असे सिनेमाचे लाबच्या लाब नाव आहे हे कळताच अपने श्याम को घुस्सा आया था ! आता ह्या सिनेमाला नुसते 'अलबर्ट' वा 'पिंटो' वा नुसतं 'घुस्सा' वा नुसतं 'क्यूं ?' असं नाव ठेवले असते तर काही बिघडले असते का ? हे experiment सिनेमावाले कहरच करतात. त्याचे सगळे experiments आपले प्रेक्षकांवरच ! अपने श्यामको इसका भी बहुत घुस्सा आता है !

शुक्रवारी हा 'अ. पिं. को घु. क्यूं आता है !' हा सिनेमा लागणार काय व राधा त्याला आधल्या गुरुवारीच त्याची तिकिटे काढायला सांगते काय ! पूर्वी जसे राजकपूर, दिलीपकुमार वा recently राजेश खन्ना, अमिताभ बच्चन ह्यांचे सिनेमा पहिल्या दिवशी अगदी पहिला 'खेळ' पहाण्यात अशिक्षित पैसेवाले मोठा अभिमान बाळगत असत, तद्वतच सुशिक्षित पैसेवाले गिरीष कर्नाड, कुमार सहानी, साटृघू, श्याम बेनेगल यांचे सिनेमे अगदी पहिल्या दिवशी पहिला 'शो' पहाण्यात स्वत:ला अगदी धन्य धन्य मानतात, हे आपल्या श्यामच्याही लक्षात आले आहे.

हे श्यामच्या लक्षात येण्याचे कारण अगदी साधे होते. ते असे. मुबईला येण्याआधी श्याम व राधा एका छोट्या परदेशात होते. आता छोटा परदेश म्हणजे कोणता ? पूर्वी परदेश म्हटला की इंग्लंडच समजले जावयाचे, पण जसा जसा ब्रेन–ड्रेन वाहू लागला तसे तसे अमेरिका, कॅनडा, प. जर्मनी हे देश विलायत समजले जाऊ लागले. पण जेव्हा ह्या देशांतून काळ्या लोकाना वाईट वागवले जाऊ लागले तसे तसे हे 'ड्रेन' मध्य आशिया, अफगाणिस्तान, इराण वगैरे देशांकडे वाहू लागले. आता हिंदी लोक कोणते कारण काढून दुसऱ्याला कमी लेखतील हे काही सागवत नाही. खरं म्हणजे दोन्ही ड्रेनच, पण अमेरिका-कॅनडा-ड्रेनमधली माणसे इराण-अफगाणिस्तान ड्रेनमधल्या माणसाना कमी प्रतीची वा छोट्या परदेशातली मानतात. असो.

सांगण्याचा मुद्दा असा की श्याम व राधा काही वर्षं अशा एका छोट्या परदेशात होते.

सिनेमांच्या दृष्टीने राधा–श्यामचे त्या परदेशात रहाणे फारच आनंददायक होते. तेथे साधारणपणे इराणी, पाकिस्तानी वा भारतीय सिनेमा येत असत. हिंदी वा भारतीय सिनेमा कमीत कमी ७–८ वर्षांपूर्वीचे जुने असत. ह्या नव्या लाटेचे सिनेमे तेथे आले नव्हते. त्यामुळे जीव शांत असे. एका सिनेमाचा हिरोच मुळी जॉनी वॉकर होता. आता बोला !

त्या सिनेमाचे एक बरे असे की ते कोणत्याही 'प्रश्ना' वर असे नसत. त्यामुळे ते प्रश्न सोडवण्याची जबाबदारी प्रेक्षकावर नसे व त्यामुळे डोक्याला त्रास असा काही नसे. बरे, त्याच तिकिटावर हेलन वा बिन्दूचा कॅबरे पहावयास मिळत असे व शकरराव–जयकिसनराव यांची ७–८ गाणी असत. सगळ्यात आनंदाची गोष्ट म्हणजे राधाला असे सिनेमा खूप खूप आवडत. म्हणजे तसे ती सिनेमे पाहिल्यावर मग 'काय पैशापरी पैसा व वेळा परी वेळ वाया गेला' वगैरे म्हणत असे; पण ते तेवढेच. कोणत्याही सिनेमातून 'अर्ध्या' संसारातून राधा कधीही उठून आली नाही.

पण आता मुबईला आल्यापासून सारेच बदलेले होते. आता 'नव्या' लाटेच्या सिनेमा-शिवाय बाकी कोणत्याही 'लाटे'चे पाणी प्यावयाची राधाची तयारी नव्हती. आल्या-आल्याच राधाला तिची एक जुनी माया नावाची मैत्रीण भेटली. तेव्हापासून लोखंडाला परिस लागल्यावर जसे होते त्याप्रमाणे राधा प्रत्येक गोष्ट 'विशिष्ट' दृष्टिकोनातूनच पाहू लागली. अगदी हिंदी सिनेमासारखे निरुपद्रवी जनावरसुद्धा ! अर्थात ह्याला रविवारचा टी. व्ही. वरचा सिनेमा हा अपवाद ! पण तो घरच्याघरी दाखवत असल्याकारणाने तो त्या 'विशिष्ट' दृष्टिकोनाच्या बाहेर रहात असे.

माया ही मोठी बिनीची कार्यकर्ती होती. कोणताही प्रश्न घ्यावयास तिची सदैव तयारी असे. किंबहुना जितके प्रश्न जास्त तेवढी माया जास्त उत्साही होत असे. मायाच्या सुदैवाने हिंदुस्थानात प्रश्नही खूप असत. उरवठ्याला पुरवठा म्हणून यूनो दरवर्ष 'कसले' तरी म्हणून साजरे करतेच. कधी वाया, कधी

बाळंके, कधी अपग, कधी काही. त्यामुळे तर काय मायाच्या दुधात अगदी ३०० रुपये ऊसवाली साखर पडत असे !

मायाच्या या 'विशिष्ट' दृष्टिकोनाचा परिणाम राधावर पण होऊ लागला. सिनेमाच्याच बाबतीत नव्हे तर सर्वच बाबतीत !

पूर्वी राधा पेंडसे, दांडेकर, बुवा यांची पुस्तके मोठ्या आवडीने वाचत असे. तसेच मराठी रसभरित ऐतिहासिक कादबऱ्या ! माधवराव व रमाबाईंच्या जीवनावरच्या कादंबरीतल्या सती जाण्याच्या प्रसंगी तर ती ढसढसा रडली होती. पण आता ? आता त्या पुस्तकांना नुसता हात लावावयाची पण तिची तयारी नसे. ह्याच कारणाकरता धूळ झटकून पुस्तके परत कपाटात लावण्याचे काम ती स्वतः न करता श्यामकडूनच करवून घेत असे.

आता राधाचे वाचन म्हणजे दलितानी–दलितांच्या जीवनावरचे अदलिताकरता लिहिलेले वाङ्मय ! बस ! फक्त नुकतीच त्यात राज्य सरकारकडून बक्षीस न मिळालेल्या पुस्तकाची भर पडली होती. श्यामला वाटावयाचे, की किर्लोस्कराच्या Folding खुर्च्या वापरणारी माणसे आपण, आपल्याला काय करावयाची आहेत सिंहासनावरची व मयूरासनावरची पुस्तके ? पण राधाला ते पटत नसे. श्यामला त्याचा पण घुस्सा येत असे. असो.

जे पुस्तकाचे बाबतीत तेच सिनेमाचे बाबतीत. चांगले राखी, रेखा, हेमा ह्यांचे सिनेमा पहावयाचे की आपले शबाना आझमीचे ? श्याम तर खूप दिवस हे नाव शबाना 'आदमी' समजत असे. शबाना 'आदमी'चा प्रथम त्याने सिनेमा पाहिला त्या वेळी त्याला आठवडाभर झोप म्हणून लागली नव्हती. बुद्धिसौंदर्याच्या उपासकांना दृष्टि–सौंदर्य अगदी उपासालासुद्धा चालत नसेल अशी श्यामला कल्पना नव्हती.

तर त्या गुरुवारी श्याम कचेरीतून दमूनभागून येतो काय व चहा–पाणी विचारण्याआधीच राधा 'अ पि. को घु. क्यूं आता है ? ची तिकिटे आणायला सागते काय ! 'पिंटो' ला घुस्सा करणे शक्य असले तरी श्यामला घुस्सा करणे परवडण्यासारखे नव्हते. म्हणून तो घाम पुसत पुसत म्हणाला, 'अग, अग, काढू. उद्याकडे तर लागणार आहे. पुढल्या आठवड्यात काढू !'

'नाही, नाही, ते नाही चालावयाचे आणि पुढल्या आठवड्यात 'पिंटो' गेला तर ?

ह्या experiment सिनेमाबद्दल ही भीती असते खरी. हा सिनेमा लागतो कधी व जातो कधी हे सर्वसामान्य माणसाला कधी कळत म्हणून नाही.

नाही तर त्या अमिताभ बच्चनच्या 'शोले' सिनेमाकडे बघा. 'शोले' बद्दल अशी एक दतकथा सांगतात. एका मुलीने एका थिएटरात मुलगी म्हणून आईबरोबर, मग काही वर्षांनी बायको म्हणून नवऱ्याबरोबर त्याच थिएटरमध्ये व आणखी काही वर्षांनी त्याच थिएटरला आई म्हणून आपल्या मुलीबरोबर तो सिनेमा पाहिला ! पुढे-मागे तिनं आजी म्हणून नातीबरोबर तोच 'शोले' त्याच थिएटरमध्ये पाहिला असता; पण 'शोले'च्याच प्रोडयूसरचा दुसरा सिनेमा निघाल्याकारणाने हा सिनेमा तेथून काढला गेला. त्यामुळे तिचा अगदी नाइलाज झाला म्हणे !

'हो, ही भीती आहे खरीच,' श्याम म्हणाला, 'पण निदान एक आठवडा तरी चालेल की नाही ? त्यातून तो experiment सिनेमा म्हणजे फक्त मॅटिनीला ! मग असं करू या–ह्या रविवारी पाहू या. म्हणजे कचेरी बुडवायला नको !'

'नाही, रविवारच्या आधीच पहायला हवा', राधा ठामपणे म्हणाली, 'एक दिवस कचेरी बुडली तर गरिबी हटवण्यात काही फरक पडत नाही !'

अंतुलेसाहेब मु. मं झाल्यापासून सर्व सरकारी नोकर सारखे गरिबी हटवण्याचेच काम करत असतात, अशी राधाची भोळी समजूत झाली होती.

'ते खरं ग पण...' श्याम.

'पण नाही नी बिण नाही रविवारच्या आत म्हणजे रविवारच्या आत ! त्यातून रविवारी आमच्या पोट–कमेटीची मीटिंग आहे.'

'पोटकमेटीची ? ही काय भानगड आहे ?'

'भानगड वगैरे काही नाही. आमच्या महिला–मंडळाच्या कुटुंब नियोजन विभागाच्या पोटकमेटीची मीटिंग आहे म्हटल.' राधा.

आता श्यामच्या डोक्यात प्रकाश पडला ! कुटुंब नियोजनाचा व पोटाचा अन्यथा लागणारा सबध येथे कसा वेगळ्या अर्थी लागतो हे बघून त्याला

तच असताना त्याने विचारले, 'पण 'पिंटो' चा व पोट–कमेटीचा काय संबंध ?'

'संबंध म्हणजे ? अहो, त्या मीटिंगच्या आधी वा नंतर 'पिंटो' पाहिला की नाही हा विषय निघणारच ! सगळ्या बायका 'पिंटो' बघून येतील. मग मीच आपली मागासवर्गाची कशी राहू ? हसतील ना मला सगळ्या !'

मग त्या शुक्रवारी उन्हात तळमळत जाऊन राधा व श्यामने तो सिनेमा पाहिला. राधालाही तो सिनेमा विशेष आवडला नव्हता व श्यामला तर बिलकूलच नाही. थिएटरमध्ये अंधार होता तोपर्यंत ते आपली नाराजी चेहऱ्यावर स्पष्ट दाखवत होते; पण दिवे लागताच त्यांचे चेहरे उजळले. श्यामने मागल्या व पुढल्या सीटवरच्या लोकांचे चेहरेही घाईघाईने स्मार्ट झाल्याचे पाहिले.

राधा व श्याम जिना उतरता उतरता सिनेमा कसा चांगला होता ह्याबद्दल प्रेक्षकात होणारी चर्चा निमूटपणे ऐकत होते. अशा 'पिंटो' सिनेमाबद्दलची नाराजी मोकळेपणाने सागता–बोलता येत नाही म्हणून 'अपने श्याम को बडा घुस्सा आया था !' □


## प्रसिद्ध झाले.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

# एक होता कार्व्हर

लेखिका : सौ वीणा गवाणकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य : रुपये पंधरा

# "खाली मैं हूँ एक बदनसीब !"....

**'हा अथांग जनसमुदाय....बाईच्यावरही याचा काही परिणाम झाला आहे का ? ....सतत चाळीस मिनिटे टिपेला पोचलेल्या आवाजात बाई बोलत राहतात....'**

# किसान मेळावा । खास वार्तालेख

**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, दिल्ली**

## एक

ऋतुचक्राचे वैभव पहावयाचे असेल तर माणसाने दिल्लीत येऊन स्थायिक व्हावे !

गडद थंडी, कडक उन्हाळा, झारीतून झरणारा मजेशीर पाऊस. आंधी आणि तुफान ! खरे पाहता साराच उत्तर भारत हे सारे अनुभवतो; पण दिल्लीत या ऋतुमानाप्रमाणे माणसे बदलतात. कपडे, हिंडणे, खाणे-पिणे, फार काय अगदी भाषासुद्धा. माणसे ऋतुचक्रात कशी मिसळून जातात !

दिल्ली ! शरद जोशींनी ज्याला इंडिया म्हटलंय त्या इंडियाचा आणि इंडियावाल्याचा गाळीव अर्क येथे राहतो. येथे राहणाऱ्या माणसांनी हजारो वर्षे साऱ्या भारतावर राज्य केलय. दावत द्यावी आणि घ्यावी. इश्क करावा आणि उधळावा. शेरशायरींनी वातावरण उधळून द्यावे. वाणीवर मिठ्ठास भरारी. बिनदरकारपणे पाठीत खंजीर खुपसावे. दूरवरून येणाऱ्या वादळाचा नुसत्या वासावरून अंदाज बांधावा आणि त्या वादळांना पुडीत बांधून खिशात घालण्याच्या हिकमती मनात बाळगत आणखी एखादी दावत द्यावी वा घ्यावी !

१४ फेब्रुवारी. रविवारची सकाळ ! दिल्लीत कोणते वादळ येणार आहे का ? येणाऱ्या वादळांना खिशात घालण्याचा कोणता बिरबली उपाय कोठे तयार होतो आहे का ? छट्ट ! हवेत तर त्याचा काही मागमूसही नाही. दिल्लीतील फेब्रुवारी. थंडी संपलेला आहे. उन्हाळा सुरू व्हायचाय. हवेत कसा उबदार गारवा आहे. अरे, वसंत वसंत म्हणून कवी आणि प्रेमिक ज्याची पूजा बांधतात तो हाच तर काल-खंड ! दिल्लीतील हवा आणि दिल्लीतील माणसे पहावयाची असतील तर माणसाने या वेळी दिल्लीत यावे. तसे पहावयाचे तर मुंबईत पाऊस पडतो तसा दिल्लीत वर्षभर सांस्कृतिक कार्यक्रमाचा अगदी पाऊस सुरू असतो. पण या सांस्कृतिक कार्यक्रमाचे वैभव, जुलूस आणि दिमाख खऱ्या अर्थाने पहावयाचा असेल तर तो पण याच वेळी पहावा.

१४ फेब्रुवारी. बाराखांबा रोडवरील 'मॉडेल स्कूलचे' प्रशस्त पटांगण. भव्य शामियाने लावलेत. आज 'शंकर्स विकली'ची बाल चित्रस्पर्धा आहे. नेहरूंची मैत्री आणि प्रतिभेचे वरदान लाभलेला शंकरसारखा एकटा कलावंत काय करू शकतो याचे हे जितेजागते उदाहरण. रंगीबेरंगी वेशातील चिमणी मुले हातात ड्रॉइंगचा फलक आणि रंग, ब्रश वगैरे सावरत धावदलीत हिंडताहेत. बाहेर स्कूटर्स, बसेस, गाड्या यांचा मेळावा. आत मुलांच्याबरोबर आलेले त्यांचे शिक्षक आणि आई-वडील. १०–१५ हजार चिमणे जीव जमलेत. तो कार्यक्रम पहावयास आलेले मंत्री आणि राजदूत. सारे वातावरण कसे चैतन्याने सळसळतय ! अरे, यक्षभूमी म्हणतात ती तर हीच– कविमन लाभलेला कोणीही माणूस केवळ यावरच किंचित् काव्यापासून महा-काव्याच्या एखाद्या सर्गापर्यंत काहीही लिहू शकेल !

हे सारे गर्दीत न मिसळता बघताना मला मात्र उगाचच एकदम बरे वाटते. 'कॅमल इंक'ने आपल्या चित्रकला-सामानाचे मोठे स्टॉल्स लावलेत. मुले, त्यांचे आई-वडील विश्वासाने गर्दी करून सामान खरेदी करताहेत. दिल्ली-मुंबई विमानप्रवास फक्त दोन तासांचा आहे हे खरे; पण तरीही दिल्लीत राहताना का कोण जाणे, मराठी माणसाचे कोठे काही चांगले पाहिले का बरे वाटते. वा ! अरे वा ! कॅमल इंक तर आम्हा मराठी माणसांचा. घरी बसून मराठी माणसाने आपली हुशारी, आपली मुत्सद्दगिरी, आपला प्रामाणिकपणा यावर वाटेल त्या कल्पना करून इमल्यावर इमले चढवावेत. मात्र बाहेर दिल्लीत वागताना आज-काल जाणवते ते इतकेच की, मराठी माणसाला वा महाराष्ट्राला तसे कुणी फारसे मनावर घेत नाही. खरे बोलायचं तर तसे अलपटातच काढतात. मराठी माणसाच्या प्रामाणिकपणाचे आणि कर्तृत्वाच या दिल्लीत बनते ते यशवंतरावांचे मिंधेपण आणि काका-मामांच्या थापांच्या सुरस कथा !

पण तसे या दिल्लीला पण काही वेळा मराठी माणसाला मनावर घ्यावे लागले असेल. येथे जमलेल्या इंडियावाल्यांच्या अर्कांची तेव्हा झोप उडाली असेल– भर दरबारात बादशहावर ओरडणाऱ्या शिवाजीने हे केले असेल. सताजी-धनाजींनी थेट अलमगिराच्या

तंबूवरील सोन्याचे कळस कापून नेले तेव्हा तर लाल किल्ल्याच्या दगडी भिंतीनी अंगावर शहारे आणत जामा मसजिदच्या गोला घुमटाना ही बातमी सांगितली असेल– कारण या दिल्लीने ताकदीत आणि हिकमतीला कधीच कमी लेखले नाही. दूरवर उडालेल्या ठिणग्यामधून आणि निखाऱ्यातून कोणत्या गाद्या बेचिराख होतील याची दखल घेताना या दिल्लीने तिळमात्र हयगय वा ढिलाई दाखवली नाही !

गेले तीन महिने दिल्लीत हिंडताना एक गोष्ट राहून राहून जाणवत होती. असा एक मराठी माणूस आज तयार होतोय. चांदणी चौक, करोलबागेतील कॉफी-अड्डे, कॅनॉट प्लेस येथे याच्याबद्दल कुजबुज चालू आहे. विद्यापीठातील प्राध्यापक मी मराठी म्हणून मला त्याच्याबद्दल अधिक काही विचारताहेत. विद्यापीठ आणि आय. टी. आय. च्या वसतिगृहात विद्यार्थी गटागटाने त्याच्याबद्दल चर्चा करताहेत. शास्त्रज्ञाच्या सभेत खाजगी संभाषणाचे नारळ याच्या नावाने फुटताहेत– इंडियावाल्यांची झोप उडते आहे आणि या इंडियावाल्यात मनोमन सामील न होऊ पाहणाऱ्या तरुण पिढीला याच्या बगावतीत आपल्या स्वप्नातील उद्याच्या भारताचा आधार दिसतोय. औरंगजेबाच्या राजवटीला मनापासून विटलेल्या तरुणाना सह्याद्रीतून उठलेल्या शिवाजीच्या ललकारीने असाच आधार दिला असेल. मूठभर मिठासाठी लोकाना घेऊन पुढे जाणाऱ्या महात्म्याने दिल्लीची झोप अशीच उडविली असेल आणि तरुण असेच अस्वस्थ झाले असतील !

– कॅमल इंकपासून मी थेट गांधीजीच्यापर्यंत या पाच मिनिटात विचार करतो याचे कारण मॉडेल स्कूलच्या या वातावरणातही शरद जोशी भरलाय, हे मला मनोमन समजलंय माझ्या मराठी मनाला थोडे बरे वाटतंय. उद्या दिल्लीत होणाऱ्या शेतकरी मेळाव्याबद्दल येथे जमलेल्या प्रत्येकाच्या मनात कमालीचे कुतूहल आहे. अगदी चिमण्या जिवाच्या मनातसुद्धा. कारण उद्या फक्त या शेतकरी मेळाव्यानिमित्त दिल्लीतील झाडून साऱ्या शाळाना सुट्टी आहे ! फक्त जयंती आणि मयंती याचीच अशी अचानक सुट्टी मिळणाऱ्या मुलाना उद्या कुणाचा वाढदिवस वा मृत्युदिवस असेल याचे कोडे असेल. भोवताली जमलेल्या कोणत्याच मोठ्या माणसाच्या मनात असा संदेह नाही. हा मेळावा का व कोणासाठी आहे हे सारे इंडियावाले जाणून आहेत. हा मेळावा, हा सन्मान आहे शरद जोशीचा ! एका नव्या विचाराच्या तेजाने आणि झळाळीने डोळे दिपलेल्यानी स्वत.च्या शेळधावर स्वत.चा थोडा विश्वास बसावा, थोडा तोल सावरावा म्हणून केलेला हा खेळ आहे. स्वत च्या मनावरचा स्वत.चा उडालेला विश्वास परत बसवावयाचा हा प्रयत्न आहे आणि म्हणूनच भरपूर मेळावे आणि मिरवणुका पहाणाऱ्या प्रत्येक दिल्लीकराच्या मनात या मेळाव्याबाबत कमालीचे औत्सुक्य आहे माझ्याबरोबर माझे तीन मित्र आहेत. डॉ. बलकारसिंग, डॉ. कृष्णन व डॉ. बोस. एक जाट, एक बंगाली, एक मद्रदेशीय. आम्हा सर्वांचा व्यवसाय भौतिक संशोधनाचा. आज मॉडेल स्कूलच्या ग्राउंडवर भेटावयाचे कारण शरद जोशी आणि त्यांचे विचार. आम्हा चौघाच्यातील समान दुवा या क्षणी एवढाच आहे. आम्ही ठरवलंय आज-उद्या मनसोक्त भटकावयाचे. पायी, सायकलने, स्कूटरने, मोटारने, जमेल त्या वाहनाने. जास्तीत जास्त अनुभव घ्यायचा. जमेल तेवढ्या लोकांना भेटायचे. आपल्यापुरते या मेळाव्याचे कोणतेही पूर्वग्रह न बाळगता एक चित्र तयार करावयाचे. आम्हाला सर्वप्रथम आठवतात ते भगत. ¤

## दोन

दिल्लीवर छावण्या पसरल्यात. या छावण्याचे नेतृत्व करणारे एच. के. एल. भगत हेही आपल्या बंगल्याबाहेरच्या हिरवळीवर एक प्रशस्त तंबू ठोकून बसलेत. चार-पाच वेगवेगळ्या रंगातील टेलिफोन्स. इलेक्ट्रिकल हिटर लावलेला. पाठीमागे दिल्लीचा मोठा नकाशा लावलेला. त्यावर निळे तांबडे झेंडे टाचण्यांनी रोवलेले. सारा देखावाच युद्धआघाडीचा. युद्धआघाडीचे नेतृत्व करणाऱ्या सेनापतीचा आवेश भगतांच्या चेहऱ्यावर आहे. खरे पाहता हा आवेश भगतांच्या सौम्य प्रकृतीला न मानवणारा.

भगत तसे सौम्य धिम्या प्रकृतीचे गृहस्थ. काँग्रेसच्या सध्याच्या भोवतालच्या लोकांत निष्ठावान वगैरे म्हणावयास लागावेत असे. खरे पाहता सात-आठ महिन्यापूर्वी भगत जवळजवळ संपलेले होते. त्याना गुडाळले होते जगदीश टायटलरनी. त्या वेळी जगदीश टायटलरची चांदी होती. 'अमर, अकबर, अँथनी' या सिनेमातील आपण अँथनी आहोत असे समजणारा आणि एकूण सगळे कर्तृत्व तसेच असलेला जगदीश टायटलर हा एका फादरचा मुलगा. हा त्या वेळी संजयचा उजवा हात होता. तो केंद्रीय मंत्रिमंडळात आज जाणार की उद्या येवढाच त्या वेळी लोकाना प्रश्न होता, पण संजय गेला आणि क्षणार्धात दिल्लीतील पटाचा सारा रंगच पालटला ! आपापल्या ठिकाणी राहून निष्ठापूर्वक काम करणारे भगतासारखे लोक पुढे आले. आज तर भगत चागलेच स्थिरावलेत. या मेळाव्यात कुणाचा वाटा किती हा प्रश्न अलाहिदा, पण आज तरी या मेळाव्याचे सूत्रधार समजले जाताहेत ते भगत !

भगत अक्षरश: दर दोन तासांनी आपल्या तंबूत एक वृत्तपत्रपरिषद घेताहेत. याला कारण परदेशी वार्ताहर. झाडून साऱ्या परदेशी वृत्तपत्रप्रतिनिधीना या मेळाव्याबद्दल कमालीचे औत्सुक्य आहे. हे असे एवढे औत्सुक्य त्यांना का आहे हे 'हिंदुस्थान टाइम्स' व 'स्टेटस्‌मन 'च्या तेथे जमलेल्या वार्ताहराना पण समजत नव्हते. भगत सांगत होते, 'या मेळाव्यासाठी एकशेपंचवीस स्पेशल रेल्वेगाड्या सोडल्या आहेत. प्रत्येकीला वीस डबे असतील. प्रत्येक डब्यात ८० ते १०० माणसे बसतील· ट्रक्स किती आणि कसे येतील हे सांगता येत नाही; पण बावीस हजार बसेसमधून–खास बसेसमधून लोक येणार आहेत!' सिगारेटचा चटका हाताला बसला तेव्हा भानावर आलो कारण भगत पुढे सांगत होते–' विमानातूनही अनेक शेतकरी येणाराहेत. खास विमानसेवा यासाठी सोडण्यात येणार आहे.' भारतातील शेतकरी विमानाने प्रवास करतात ही माहिती सुखद होती मेळाव्याच्या एकूण आवाक्याची पण कल्पना यायला लागली होती.

वसतदादा तसे भगताना वरिष्ठ; पण कामाच्या वेळी दादा असे

काही मानत नाहीत. दादा तेथेच बसलेले होते. दादांनी माहिती पुरवली. हरियानामधून सात लाख शेतकरी येणाराहेत. उत्तर प्रदेशातून, पंजाबातून पाच लाख प्रत्येकी. महाराष्ट्र–कर्नाटकातूनही प्रत्येकी पन्नास हजार लोक येतील. त्याना राहण्यासाठी एकूण पंचवीस प्रशस्त वसाहती आज दिल्लीत उभ्या आहेत. दोन हजार सफाई कामगार या जागेची सफाई करतील. दिल्ली नगरपालिकेने पाण्याचे नळ दिलेत. दहा हजाराहून अधिक संडास पुरवलेत. प्रत्येक वसाहतीच्या दारात तुम्हाला वैद्यक उपचार केन्द्रे दिसतील. तेथे दूरदर्शनची सोय आहे. तेथे पाहिजे त्याला एक रुपयाला पोटभर जेवण मिळेल. याशिवाय मोफत टेलिफोनव्यवस्था आहे. या केन्द्रातून २६ वैद्यकीय पथके गाडीतून पण हिंडत असतील !

भगत सांगत होते, ' मला कोणत्याच मेळाव्याशी याची तुलना करावयाची नाही, पण नुकतीच शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दोन आंदोलने झाली. एक शरद पवाराचे होते. ते राजकीय होते. दुसरे शरद जोशीचे झाले. ते हिंसक होते. आमचे ...'

पण भगत पुढे काय सांगतात ते आता आम्हाला ऐकावयाचे नव्हते. कारण उद्या काय होणार ते आम्ही चार जण आठ डोळयांनी पाहाणारच होतो. किसान मेळाव्याचा आवाका केवढा मोठा आहे हे आम्हाला आता जाणवले होते. त्या वेळीही तेथे असलेला ' हिंदुस्थान टाइम्स 'चा वार्ताहर यातील निम्मे तंबू मोकळे राहतील आणि या फक्त गप्पा आहेत म्हणून सांगत होता. त्यामुळे या छावण्यात खरोखरच काय घडते आहे हे आम्हाला पहावयाचे होते. आम्ही चौघेही तेथून बाहेर पडलो. दोन वाजून गेले होते. बदलणाऱ्या हवेचा आणि येणाऱ्या झंझावाताचा अंदाज रस्त्यावर आल्यावरच आला. बिचारा हिंदुस्थान टाइम्सचा वार्ताहर पार चुकला होता. रस्त्यावरच्या मोकळया भिंती, मिळेल ती मोकळी जागा म्हणा हवी तर, पोस्टर्सनी भरलेली होती पोस्टर्स रंगीत होती, पण प्रतिभाशून्य होती. ' किसान शान इंदिरा जान' अशी काही वाक्ये लावलेली होती; ' राष्ट्रके इतिहासमें ऐसा ही कोई क्षण आता है जब नेता और जनता को मिलना जरूरी होता है ' वगैरे वगैरे. सार्वत्रिक निवडणुकाच्या वेळी कल्पक पोस्टर्स काढणाऱ्या कॉंग्रेसचा दर्जा येवढा का घसरावा हे समजत नव्हते. रस्त्यावर स्कुटर्स, सायकल्स, ट्रक्स, बसेस यावर कॉंग्रेसचे छोटे-मोठे झेंडे लावलेले होते. पायी, ट्रक्समधून मजेत किसानांच्या टोळया फिरत होत्या. दिल्ली पहावयास आलेल्या शाळकरी मुलाचा उत्साह त्यांच्या चेहऱ्यांवर होता. वातावरणनिर्मिती म्हणजे काय ते समजत होते. मेळाव्याची धुंदी दिल्लीवर चढत होती.

आम्हाला छावण्या पहावयाच्या होत्या. सर्वात मोठी छावणी लाल किल्ल्यासमोर होती. विजय मार्गावर सत्तर हजार लोक ठेवले होते. निजामउद्दीनस्टेशन, मोतीयाखान, पजाबी बाग–छावण्या तर साऱ्या दिल्लीभर पसरल्या होत्या. आम्ही चार मित्र चार दिशांना फुटलो. संध्याकाळी अजयगडकडे भेटायचे ठरवले. मी रिंगरोडवरून अजयगडकडे निघालो आणि अक्षरशः हरवून गेलो. रिंगरोडवर अजस्त्र म्हणाव्यात अशा छावण्या लागल्या होत्या. राजघाट, शांतिघाट, विजय घाट याच्या समोर अक्षरशः नवी शहरे उठली होती !. गाडी शांतिघाटच्या बगलेत उभी केली आणि एका छावणीत शिरलो. शिदोऱ्या सोडून लोक जमले होते. मजेत आघोळी सुरू होत्या. प्रत्येकाने बिछाने आणलेच होते, पण जमिनीवर जाड जाजमे पसरलेली होती. रसोईघरात जेवण तयार होते, पण भारतीय किसानाला बहुधा फुकटात जेवावयास आवडत नसावे. फार थोडे लोक तेथे जेवण घेत होते. एका बाजूला लाकडाचे ढीग रचून ठेवले होते. रात्रभर प्रत्येक छावणीत मोठया शेकोटया पेटणार होत्या. आघोळ करून किसानाचे थवे वळत होते ते राजघाट–शांतिघाटकडे. खरे पाहता या दोन स्थानांनी तसे काय भोगले नाही ? राजनारायणांचे गंगाजल पाहिले. संजयची चिता पाहिली. परकीय नेत्यांच्या दैनंदिन भेटी पाहिल्या, पण आज तेथे जमलेली जत्रा त्या स्थानांनाही नवी असेल ! आई-वडिलाच्या समाधीला भेट देणाऱ्या मुलाची भावुकता ज्याच्या चेहऱ्यावर आहे अशी माणसे थव्याने येताहेत–आणि तेथे फक्त समोरच्याच छावणीतील लोक नव्हते. लाल किल्ल्यावरील छावणी, पंजाबी बागमधील छावणी, बरफखान्याची छावणी येथील किसान सरळ चालत आले होते. दिल्लीतील आजची हवा चालायला तशी छान होती. त्यातून पायी चालणे ही किसानाची सवय असावी. १०–१२ किलोमीटर चालणे म्हणजे किस झाड की पत्ती !

–कोपऱ्यात काही ट्रक्स उभे होते. ट्रकड्रायव्हर गांधीची शपथ घेऊन सांगावयास तयार होता की, दोन दिवसांपूर्वी त्याला चेकपोस्टवर थांबवण्यात आले. परवाना–नंबर वगैरे लिहून घेण्यात आला आणि कोणत्या क्षणी कोठे माणसे घ्यावयास जावयाचे हे सांगण्यात आले; तो पण तसा रागावलेला नव्हता. कारण तिथे डिझेल लगेच फुकट मिळणार होते. दुसरे म्हणजे तोही या मेळाव्यात तसा रंगून गेला होता. प्रत्येकालाच तसा काही बदल आणि करमणूक हवी असते. विजयघाटावर गाजियाबाद–फरिदाबादचे काही छोटे कारखानदार भेटले. ते मात्र जाम संतापलेले होते. त्यांची वहाने तर त्याना स्वखुशीने द्यावी लागली होतीच, पण उद्या कारखाने सक्तीने बंद ठेवायचे होते. या छोटया कारखानदारांच्या संघटनेनेच मुळी झंझट नको म्हणून उद्या पगारी सुट्टी जाहीर केली होती !

हा फेरफटका संपवून मी अजयगडला पोचलो त्या वेळी सहा वाजून गेले होते. अजयगड हे दिल्लीत फार थोडया लोकाना माहित असलेले आणि आम्हा मित्राना आवडणारे एक स्थान आहे. सब्जीमंडी बरफखान्याला टांग मारून आणि सेंट स्टिफन्स हॉस्पिटलला बगलेत मारून पहाडीच्या रस्त्याने वर गेले की अजयगड लागतो. तो नेमका तसा हिंदुराव हॉस्पिटलसमोर उभा आहे. लांबून हे एखादे उंच चर्च असावे, मिनार असावा असे काहीसे वाटते. या मिनाराच्या वर गेले की पुराणी दिल्ली दुर्बिणीशिवायसुद्धा छान दिसते; पण आमच्या दृष्टीने या स्थानाचे महत्त्व वेगळे आहे. येथे आले की काळाच्या प्रवाहाची क्षणभंगुरता समजते. यश आणि अपयश याची शाश्वत मूल्ये जाणवतात. अठराशे सत्तावन्न साली शेवटची लढाई ब्रिटिश दिल्लीत जिंकले. त्याच्या वतीने लढणारे जे गोरे आणि काळे सैनिक शत्रूकडून मारले गेले, शहीद बनले, त्या शहिदाच्या सन्मानासाठी हा भव्य, सुंदर मनोरा टेकडीवर उभारलाय ! बाहेर तसा फलक लावलाय. मनोऱ्याच्या चारी बाजूना शत्रूकडून मारल्या गेलेल्या गोऱ्या सेनानीची अनेक नावे आहेत. एकूण किती गोरे व काळे सैनिक शत्रूकडून कसे व केव्हा मारले गेले याची आकडेवारी आहे. अगदी १९७५ सालापर्यंत अजयगड

असाच होता. त्या वर्षी सरकारने एक फलक लावला. 'यात ज्यांचा शत्रू म्हणून उल्लेख आहे ते खरे स्वातंत्र्यसैनिक होते.'—समोर शकराचे एक छोटे मंदिर आहे. जवळ अशोकाने मिरतला उभारलेला एक स्तंभ, १७०० साली उपटून आणून लावलेला आहे. जवळ एक म्हातारा बैरागी कधीकधी असतो. तो तर आणखीनच मजेशीर गोष्ट सांगतो. तो म्हणतो, 'मनोऱ्यावर नावे लिहिणारा माणूस हुशार होता. त्याने मनोऱ्याच्या आत गेलेल्या बाजूवर स्वातंत्र्यसैनिकांची नावे आणि आकडेवारी उर्दूत नक्षी वाटावी अशी लिहिली होती. बाहेर आपली सरकारने सांगितलेली नावे ! १९०१–२ च्या सुमारास ही बातमी बाहेर फुटली. रातोरात बसवलेले दगड काढून बदलण्यात आले ! असो. लाल किल्ल्याजवळ पुरलेला इतिहास जनता सरकारने उकरला तो देखावा आम्ही मित्रांनी याच मनोऱ्यावर चढून पाहिला होता ! उद्या इंदिरा सरकार जेव्हा कुपी पुन्हा पुरणार आहे तेव्हा आम्ही ते येथूनच पहाणार आहो ! आज अजयगडहून दिसणारी पुराणी दिल्ली मात्र एकदम वेगळी आहे. साऱ्या शहराला अक्षरशः लष्करी छावणीची कळा आलेली आहे. रंगीबेरंगी कपड्यांत चालणारे चित्रविचित्र जथे दिसताहेत. आम्हा सर्व मित्रांना आलेला अनुभव तसा एकाच स्वरूपाचा आहे. प्रचंड गर्दी जमलेली आहे. जमते आहे. दृष्ट लागावी अशी व्यवस्था आहे. लोकांच्यात अमाप उत्साह आहे. आपण इंदिरेला आणि राजधानीला पहावयास आलोय हे सारेचजण मान्य करताहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शरद जोशीला नावाने फारच थोडेजण ओळखत असले तरी महाराष्ट्रात आग्रारोडवर झालेल्या कांदा–आंदोलनाची झाडून साऱ्यांना माहिती आहे. शहरी लोकांना न समजलेले खेड्यातील लोकांचे एकमेकांना माहिती पुरवण्याचे काही साधन असावे !—निवडणुकांच्या वेळी क्षणार्धात साऱ्या देशभर एखादी लाट पसरते. केव्हा केव्हा चपातीवरून विचार पाठवले जातात, कधी ते कमळाच्या फुलातून जातात तर कधी कांद्याबरोबर !

—चपाती, कांदा वगैरेची आठवण यावयाचे आणखी एखादे कारण असावे. कारण आम्हा सर्वांनाच आता चांगून भुका लागल्या होत्या. तसे दमलोही होतो. त्यातून उद्या पहाटेच कुंभमेळ्यात सामील होण्यासाठी बाहेर पडावयाचे होते. आम्ही एखाद्या छावणीतच जाऊन मोफतचे जेवण उरकायचे ठरवले.

—शाळा-कॉलेजातील चलाख मुले, मुंबईत, पुण्यात, वाटेवरच्या एखाद्या मंगल कार्यालयात न बोलवता घुसून साळसूद चेहऱ्याने आइस्क्रीम वगैरे खाऊन यतात तसा आमचा हा बेत होता. कोल्हापूररोडवरून आम्ही कमलानगरच्या पिछाडीला असलेल्या छावणीकडे निघालो. दिल्लीचे तख्त फोडावयास आलेली कोल्हापूरकराची फौज या भागात उतरली होती म्हणून याला कोल्हापूररोड नाव पडले असे म्हणतात. कुणा सांगावे, या मेळाव्यामुळे पुढ-मागे येथे सांगलीरोडही उभा राहील !

छावणीतील जेवावयाची सोय खरोखरच अप्रतिम होती. दिल्लीत या मोसमात भाज्या मुळातच स्वस्त. अगदी शरद जोशींनी येथे येऊन आंदोलन उभारावे इतक्या ! प्रमुख मंडीमध्ये फ्लॉवर आठ आणे किलो आणि मटार एक रुपया किलो ! मुळे चार आणे किलो. या छावणीला लागूनच घंटाघर सब्जीमंडी आहे म्हणून असेल कदाचित. पुऱ्या, फ्लॉवरची भाजी, मटाराचा रस्सा, भात असा छान चमचमीत बेत होता. येथेही आलेल्यांपैकी फारच थोडेजण जेवण घेत होते. त्यामुळे आमच्यासारख्या साळसूद चेहऱ्याच्या माणसांना मजेत जेवण मिळाले. पोटाला तड लागेपर्यंत खावयाचा मोह होत होता; पण उद्या सकाळी ४–५ ला बाहेर पडावयाचा बेत होता, त्यामुळे तो मोह आम्ही टाळला. भराभर चार घास खाल्ले आणि बाराखांबारोडवरील डॉ कृष्णनच्या घरी मुक्कामाला गेलो ! ◻

## तीन

मी मिरवणुका पाहिल्यात, सभा पाहिल्यात. जनसागरात नाहीसा होत हे सारे अनेकदा भोगलंय !

—१०५ हुतात्म्यांची शपथ घालत महाराष्ट्राच्या पंचप्राणांनी सत्तावन्नच्या निवडणुकांच्या आदले दिवशी शिवतीर्थावर घेतलेली ती सभा हजार वर्षांत न झालेली, पुढील हजार वर्षांत न होऊ शकणारी !

—संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश घेऊन आल्यावर चव्हाण–नेहरूंचा शिवतीर्थावर झालेला अभूतपूर्व सत्कार.

—आणीबाणीनंतर तुरुंगातून सुटलेल्या विरोधी पक्षनेत्यांना ऐकण्यासाठी रामलीला मैदानावर जमलेला तो अथांग जनसमुदाय.

—२३ डिसेंबर १९७८ ला चरणसिंगांनी आपला वाढदिवस साजरा करावयास जमवलेला तो हरियानातील जाटांचा विराट मेळावा.

हे सारे मी अगदी जवळून पाहिलंय; पण आज येथे जो जनसागर ओसंडलाय त्यापुढे 'मामुली' येवढ्या एकाच शब्दात या साऱ्या सभांची बोळवण करावी लागेल. हा शब्दशः महासागर आहे. दिल्लीला रस्त्यावर अक्षरशः माणसांची डोकी उगवलीत. चित्रविचित्र पोशाख, चित्रविचित्र भाषा, चेहऱ्यावर ओसंडणारे ते बालिश कुतूहल आणि संघीयांनीही हेवा करावा असे शिस्तबद्ध संथ गतीने चालणे !

दिल्लीकर यांना पाहून मनोमन हबकलेत. ४९ साली पेकिंगच्या रस्त्यावर अवतरलेल्या, माओसारख्याच फाटक्या आणि मळक्या वेशातील आणि बसमध्ये पण तिकिट काढून नम्रतेने फिरणाऱ्या त्याच्या शेतकरी सैनिकांना पाहून पेकिंगवाल्यांना किंवा चायनावाल्यांना पण असाच हादरा बसला असेल ! एक क्षणभरही या जनसमुदायाने मनात नुसता विचार आणला असता तरी सारी दिल्ली त्यांची होती. जगातील कोणतीही सेना या जमावाला अडवू शकणार नाही.

पण अगदी क्षणभरसुद्धा हा जमाव असला काही विचार करणार नाही. कारण यांच्याकडे या क्षणी तरी कोणताच विचार नाही. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे हा मुळी जमाव नाहीच! ही एकत्र जमलेली

**जगातील कोणतीही सेना या जमावाला आता अडवू शकणार नाही !**

या जमवलेली सुटी माणसे आहेत. अधिक काटेकोरपणे बोलावयाचे तर माणसांचेगठ्ठे आहेत वा थवे आहेत. लोकलमधून प्रवास करणारा वा कुंभमेळघाला आलेला जमाव सुद्धा मानसिकदृष्ट्या यापेक्षा अधिक एकसंध असतो. शिवतीर्थावरील मी मागे उल्लेख केलेल्या सभात तर जमावाच्या भावनाचे अक्षरश: सिमेंट झालेले होते !

त्यामुळेच माझ्या मते हा जनसमुदाय दहा लाखाचा आहे, पंचवीस लाखाचा आहे की चाळीस लाखाचा आहे हा प्रश्न दुय्यम स्वरूपाचा होता; पण कालपासून मला भेटणारे झाडून सारे राजकीय पुढारी या फालतू प्रश्नावरच डोकेफोड करीत होते. बाईंनी ही गुगली का व कोणासाठी टाकली आहे यावर चर्चा करावयासच कोणी तयार नव्हता! आज सकाळी सर्वप्रथम भेटले होते ते भारतीय जनता पक्षाच्या दिल्ली शाखेचे प्रमुख श्री. गुप्ता. आम्ही तसे विकासमिनारापर्यंत एकदमच पोहोचलो. तोवर तेथे बिहारहून आलेले व लाल किल्ल्यासमोर उतरलेले किसान पोचलेही होते. मंडळी भल्या पहाटे चार–पाच वाजताच उठून पदयात्रेला बाहेर पडली असावीत. आम्हाला कोणालाच त्या जमावाची भाषा येत नव्हती. श्री गुप्ताच्याबरोबर बिहारमधला संघाचा एखादा प्रचारकही नव्हता. मात्र गुप्ता आग्रहाने सागत होते, यातील फक्त वीस टक्के शेतकरी आहेत. बाकी सारे मोठ्या शहरातील पांढरपेशे ! माझ्याबरोबरचा डॉ. बलकारसिंग जाट शेतकरी. तो म्हणाला, 'गुप्ताजी, आप कहते है वो जनता नही '–' साहेब, आपण सागता ते अजिबात पटत नाही. खरे सागायचे तर शहरातील हा पांढरपेशावर्ग आणि बनियावर्ग तुमचा. त्याला कोणी हात लावतंय म्हणून अस्वस्थ होऊ नका ! त्याला तसे कोणीच हात लावू शकणार नाही. अहो, खऱ्या अर्थाने अगदी महात्मा गांधीसुद्धा त्यांना हात लावू शकले नव्हते; पण आपण या शेतकऱ्यापर्यंत कसे आणि केव्हा पोचणार आहात तेवढे सागा !'

कालपासून भेटलेल्या झाडून साऱ्या विरोधी पक्षाच्या नेत्याचा आणि कार्यकर्त्यांचा राग होता चरणसिंगावर. त्यानी उगाच काही वेडपासारखे पायडे पाडून ठेवले म्हणून. लोहिया समाजवादी पक्षातील तसे फारसे कोणी भेटले नव्हते; पण त्याना भेटूनही फायदा नसतो. केव्हाही भेटा, मधु लिमये आणि चरणसिंग यात कोणी कोणाला अधिक बिघडवले याच विषयावर ती मंडळी बोलावयास लागतात !

त्यापेक्षा काळ-कामाच्या खाली वाकले असतानाही आमच्यासाठी दहा मिनिटे खर्च करणारे वसंतदादा मला अधिक चागले वाटले. दादाचे एक बरे आहे. त्याना सध्या दिल्लीत कोण व किती विचारते हा प्रश्न वेगळा; पण दादा मात्र मराठी माणसाची जमेल तेवढी काळजी घेतात. 'ससा आणि कासव' याच्या शर्यतीतील कासवाप्रमाणे दादा आपले बस्तान बसवतील असे मला वाटते. माणसे कशी पारखावीत, पारखलेली माणसे जोडावीत कशी आणि सवटनेचे जाळे कसे आणि कुठे पसरवावे हे दादाना पुरते माहीत आहे. त्याच्याजवळ स्वत:चे असे बनवलेले आणि वापरलेले काही आडाखे आहेत.

दादा म्हणाले होते, 'हे वारकरी जमलेत. वारकरी कसे व कुणाच्या पैशाने आलेत ते विचारू नका ! देवदर्शनासाठी तीर्थयात्रेला माणसे जातात. पदरमोड करून जातात. '–दादा पैशाच्या प्रश्नाला चलाखीने बगल देताहेत हे पाहून मी म्हटले होते, 'दादा, हे सारे खरे; पण वारकरी आणि तीर्थयात्रा हे दोन वेगळे प्रकार आहेत. त्यातून देवदर्शनही वेगवेगळ्या स्वरूपाचे असते. म्हातारा–म्हातारी जीवनाचे सारे घेणे–देणे चुकवून निवातपणे काशीयात्रेला जातात. याउलट कपनीचा अधिकारी प्रमोशन समोर आले असताना वा कारखानदार धदा पुढे आला असताना तिरुपतीला वा सत्यसाईबाबाच्या दर्शनाला जातात. यातील कोणत्या स्वरूपाचे दर्शन घ्यायला जमलेत हे लोक ?'

दादा क्षणभर गप्प बसतात. नतर एकदम दिलखुलास हसतात. दिल्लीत आल्यापासून यापूर्वी फक्त यशवंतरावानाच जमणारे ते दिलखुलास हास्य दादांनी हस्तगत केलंय; पण या हास्याचा माझ्यापुरता कामराजी अर्थ होता 'पाराकलम !' दादा खरोखरच फार गडबडीत होते. पुढे केव्हाही इतर प्रश्नावर मोकळेपणाने बोलण्याचे त्यानी मान्य केले, येवढीच या दहा मिनिटांची फलश्रुती होती. त्यातून कोणत्याही कारणाने व कसेही शेतकऱ्यासाठी काही तरी होतय म्हणून दादा मनोमन सुखावलेत हे पण जाणवले होते.

आणि दादाना काल अभिप्रेत असलेले ते शेतकरी आमच्या भोवती पसरलेत. मंडळी मजेत, सुखात शहर बघत चाललीत. अनेकाच्या हातात कॉंग्रेसचे झेंडे वा इंदिरेचे फोटो आहेत. रंगीबेरंगी झेडे. त्याच्या काठ्या सुद्धा रंगीत ! रंगीत फोटो. राजस्थानातून आलेल्या शेतकऱ्याच्या डोक्यावर भल्या मोठ्या भगव्या मारवाडी पगड्या आहेत. हातात भाले घेऊन हिंडणारे निळे फेटे लावलेले निहाग शिख भगव्या कपड्यात हिंडणारे साधूचे थवे. एक भव्य व्यासपीठ उभारलय. बलूनला लावून १५ फूट उंचीचे बाईंचे एक रंगीत चित्र हवेत तरंगतय. जणू इंद्रधनुष्याच्या रंगाची पसरण दिल्लीच्या रस्त्यावर झालीये. 'बोटक्लबपासून इंडियागेट'पर्यंतचा दोन किलोमीटर लाबीचा रस्ता माणसानी नुसता खचाखच भरलाय. अगदी मुगीलाही शिरता येणार नाही असा. माईकवरून लताची गाणी वाजवली जाताहेत. 'ओ मेरे वतनके लोगो' तर पुन्हा पुन्हा वाजतंय. वरून दोन–तीनदा हेलिकॉप्टर उडत जातंय. इंदिराजी त्यात बसून हा सारा सोहळा पाहताहेत म्हणे ! घड्याळाचे काटे पुढे जात होते. आता तसा वाट पहावयाचा कटाळा आला होता. बाईंनी लवकर यावे असे मनोमन वाटत होते, पण नेत्याचे काही सागता येत नाही. आपल्या मागच्या मेळाव्यात चरणसिंग चांगले चार वाजताच आले होते; पण बाईंनी असला काही प्रकार केला नाही. एक वाजून पाच–दहा मिनिटे झाली आणि पाढ-यांशुभ्र साडीतील प्रसन्नमुख इंदिराजी व्यासपीठावर चढल्या ! ◻

## चार

इंदिरा सभेत आली आणि दिल्लीच्या भाषेत सभेचा 'माहोल' क्षणार्धात बदलला. पुरुष ती नीट दिसावी म्हणून उगाचच उभे राहिले. बायाबापड्यानी आपले हात जोडले मात्र सभेत तशी कोणतीच घोषणा उठली नाही. लोकानी आपल्या लाडक्या नेत्याचे गगनभेदी आवाजात स्वागत करावे असे काही घडले नाही. साऱ्या

सभेतून इंदिरा प्रेमाची एखादी लहर किंवा शिरशिरी म्हणा हवी तर थरारून गेली असे काही वाटले नाही.

पण बाई बोलायला उठल्या आणि काळजाचा ठोका चुकला. दिल्लीकराना बाईंची भाषणे नवीन नाहीत. १५ ऑगस्टपासून, मुसलमानानी भारतीय संस्कृतीवर काय उपकार केले हे त्याच्या परिषदेत सागण्यापर्यंत बाई सर्वत्र बोलतात. भाषणांच्या व समारंभाच्या रमीचे वेड असलेले आमच्यासारखे काही हौशी ही भाषणे ऐकावयास जातात. बाकीच्यांना ती दूरदर्शनवर सक्तीने पहावी व ऐकावी लागतात. १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावर भाषण देताना बाईंनी मधेच औषधाची गोळी कशी व का खाल्ली यावर सब्जी मंडी पासून ऑफिसपर्यंत रसिकतेने चर्चा होतात. बाईंचे ते १५ ऑगस्टचे भाषण आत्तापर्यंत नेहरू, शास्त्री वगैरेंना न जमणारे कसे अप्रतिम होते हे खुशवंतसिंग मग महिनाभर लिहीत बसतो हे सारे क्षणार्धात आठवते; पण तरीही काळजाचा ठोका चुकतोच !

कारण आजचा आवाज. हा आवाज बाईंचा नाही. आयुष्यात अगदी प्रथमच राणा भीमदेवी सुरात बाईंचा आवाज चक्क टिपेला पोचलाय. खरं सागायचं तर बाई जवळजवळ सरळ किंचाळतच बोलताहेत. बाईंच्या आत्तापर्यंतच्या कुठल्याही भाषणात हे मी कुठेही अनुभवलेले नाही. बाईंची अनेक भाषणे ऐकलेल्या माझ्या कुठल्या मित्रानी व दिल्लीच्या वार्ताहरांनी पण हा आवाज कधी ऐकला नाही. हा जमलेला अथाग जनसमुदाय. बाईंच्यावरही याचा काही परिणाम झालाय का ? –मनावरचे काही फार मोठे दडपण कमी झाल्याचा वा मनावर असे काही दडपण अचानक आल्याचा हा परिणाम आहे का ? आणि तसे असेल तर हे दडपण कुणाचे ? कुठले ?

' भारतीय किसानानो, मी तुमचे स्वागत करते. त्यासाठी मी येथे आले आहे ' या भावपूर्ण शब्दात भाषणाची सुरुवात होते. ' द्वारका से लेकर पुरीतक, कश्मिर से लेकर कन्याकुमारीतक, नागालँड आसाम सारा भारत आज मेरे सामने खडा है ' हे म्हणताना तर बाई चक्क रडणार असे वाटावे असा त्याचा आवाज दाटून येतो आणि नंतर सतत चाळीस मिनटे अगदी टिपेला पोचलेल्या आवाजात बाई बोलत राहतात.

सर्वप्रथम बाई कोपरखळी मारतात ती चरणसिंगांना. त्याचे नाव न घेता त्या म्हणतात ही रॅली कॉंग्रेसने बोलावली आहे पण ही कॉंग्रेसची नाही– ये पार्टीकी रॅली नही, देशकी–भारतकी रॅली है – आज असा मेळावा भरवणे चुकीचे आहे असे अनेक जण म्हणताहेत. मजेची गोष्ट अशी की आज असे म्हणणाऱ्यानीच मागे अशी रॅली भरवण्याचा प्रयत्न केला होता. ती रॅली केवढी मोठी झाली आणि तुमच्यापैकी खरेच किती जण त्याला आले होते मला माहीत नाही. कारण ... कारण ... उस समय एक नही कई सौ तालियोके अंदर मैं तिहार जेल में बंद थी !

त्यानंतर बाई सांगतात कुरबानी द्यावी लागली तरी चालेल, पण शेतकऱ्यांची स्थिती सुधारायचीच म्हणून मी ठरवलंय– चाहे जेल जाना हो चाहे सीर कटाना हो ! त्यानंतर बाई वळतात कांग्रेसच्या इतिहासाकडे. त्या म्हणतात आज कोठे छोटी–मोठी शेतकरी आंदोलने होताहेत. आणि कॉंग्रेस शेतकऱ्याच्यासाठी काही करत नाही. म्हणून ते लोक डांगोरा पिटताहेत. अरे, कॉंग्रेसची सुरुवात झाली ती मुळी बार्डोली आणि चपारण्यातील शेतकरी आंदोलनानी. ४७ साली राज्यावर आल्यावर कॉंग्रेसने पहिली गोष्ट केली शेतकऱ्यांसाठी. आम्ही सर्वप्रथम गाडला तो जमीनदारीचा भस्मासूर. त्यानंतर कागद वगैरे न बघता चार-पाच मिनिटात सहाव्या पंचवार्षिक योजनेत सरकार किसानांसाठी काय करणार आहे याची आकडेवारी फेकतात. त्यातही शहरातील लोकाच्या मानाने खेड्यातील लोकासाठी कसे झुकते माप आहे हे खुबीने सागतात. गन्ना आणि कपास याचे दर वाढवून दिले आहेत हे सागून हे सारे तसे यापूर्वीच व्हावयास पाहिजे होते हे पण मान्य करतात आणि त्याच सफाईने सागतात– ' बिच में हम हार गये थे ना इसके वजह से ये देरी हुअी ! नही तो ऐसाही न होता ! '

भाषणातील शेवटचे किसानस्तुतीचे पर्व मग सुरू होते. बाई सांगतात स्वातंत्र्यानतर या देशातील शेतीउत्पन्न तीन पटीनी वाढले. बहादूर शेतकऱ्यानो, तुमच्यामुळे हे झाले. जगातील कोणत्याही देशात हे झालेले नाही. कोणतीही विचारधारा असलेल्या देशाला हे जमलेले नाही आणि हे थोडे स्पष्ट करून सागताना बाई थोडी चूक करतात. त्या पुन्हा पुन्हा त्याच देशांचा उल्लेख करतात. ' चाहे वो कम्युनिस्ट देश हो. चाहे वो मार्क्सके विचारोसे चलनेवाले देश हो. चाहे वो साम्यवादी देश हो ।' इतर कोणत्याच देशाचा त्या उल्लेख करत नाहीत.

हा असा बहादूर शेतकरी. याच्यात आणि कामगाराच्यात झगडे लावण्याचा आज काही जण प्रयत्न करताहेत. ते लोक तुम्हाला, शेतकऱ्याला समजलेले नाहीत. प्रत्येक शेतकऱ्याला तीन मुले असतात. एक शेतात असतो. दुसरा शहरात कामगार बनून देशाची सेवा करतो. तिसरा जवान बनून देशाची सीमा साभाळतो ही या देशाची एकता आहे. बाई घोळून आणि आवर्जून सागतात, खऱ्या अर्थाने या देशातील प्रत्येक जण किसानच आहे– ' कौन है इस देश मे जो किसान का बेटा नही है । खाली मैं हूँ एक बदनसीब ...' बाईंच्या या वाक्यावर सभा अक्षरश: हेलावते. ' भारत माता की जय ' ची बाई जमावाबरोबर त्रिवार ललकार देतात आणि चाळीस मिनिटे सुरू असलेले हे नाट्य संपते !

आणखी कोणी यापूर्वी वा यानतरही बोलावयास नव्हते ते तसे छानच झाले. पण बाईंचे भाषण झाले नि सभा अक्षरश: संपली. बाई गेल्या आणि लगेच संयोजकानी, आलेल्या आमदार-खासदारांनी आणि पोलिसानी अक्षरश घरी परत पळावयास सुरुवात केली. परीक्षा संपल्यावर असतो तसा ताण संपल्याचा आनद त्याच्या चेहऱ्यावर होता. आपण असलो-नसलो तरीही हा जमाव शाततेने आणि रमत-गमत परतेल असा विश्वासही त्यांना आलेला असावा. केवळ मजा म्हणूनच आम्ही चौघे मित्र त्या दिवशी

## कौन है इस देश में जो किसान का बेटा नहीं है ?

रेल्वेस्टेशन *आणि अंतरराज्य बसअड्डा पहावयास गेलो, आणि* म्हणूनच आणखी एक नाटक आम्हाला पहावयास मिळाले. व्यक्तित्व संपल्यानंतर उरणारा तो बाकीचा भागही तसा अनुभवण्यासारखा होता. ट्रक आणि बसेस्मधून जाणारे लोक गर्दी सोसूनही मजेत हसत-खिदळत जात होते; पण रेल्वेस्टेशनची हालत फार खराब होती. प्रचंड गर्दी! कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. मुंबईला ऑफिस सुटल्यावर, दोन-तीन तास लोकलसेवा विस्कळित झाल्यावर चर्चगेट, बोरीबंदरला येणारी कळा यापेक्षा बरी असते. स्टेशनात आम्हाला भेटले श्री. सोमाणी. ते पाटणा म्युनिसिपल बोर्डाचे अध्यक्ष आहेत. पाटण्याला जाणाऱ्या एअरकण्डिशन्ड प्रथम श्रेणीच्या डब्याबाहेर ते संतप्त मनःस्थितीत उभे होते. आपल्याला दिल्लीत आणून सोडल्यावर संयोजक निघून गेले. आपली व आपल्याबरोबरच्या लोकांची कशी उपासमार झाली वगैरे ते तावातावाने सांगत होते. आम्ही कुठल्या तरी दिल्लीतील वर्तमानपत्राचे वार्ताहर आहोत असा त्याचा समज झालेला होता. आम्हाला मात्र त्याना पाहून त्यानी आणखी काही उपाय करणे अगत्याचे आहे असे सांगण्याचा अगदी अनावर मोह होत होता तेवढ्यात आम्हाला वार्ताहर समजून श्री. व सौ.श्रीवास्तव आमच्यासमोर येऊन उभे राहिले. त्यांची शोकांतिका तर याहूनही अधिक होती त्यांनी १ महिना आधी दिल्लीहून हावऱ्याला जाण्यासाठी प्रथमश्रेणी एअरकन्डिशनची तिकिटे आरक्षित केली होती. 82 DN हावरा एक्सप्रेसच्या डबाक्रमाक १०६६ वर लावलेल्या आरक्षकयादीत पाच मिनिटांपूर्वीपर्यंत त्याचे नावही होते; पण आत्ताच येऊन रेल्वेच्या एका ऑफिसरने त्यांचे नाव खोडून तेथे बिहारचे समाजकल्याणखात्याचे मंत्री श्री. मिश्रीसादा याचे नाव लिहिले होते आणि मंत्री सपत्नीक जाऊन त्याच्या जागेवर बसलेसुद्धा होते! मंत्र्याचा स्थितप्रज्ञ चेहरा पाहून त्याच्या या समाजकल्याणाला हसावे की रडावे हेच आम्हाला समजत नव्हते. श्रीवास्तवाच्यावर झालेला *अन्याय आम्ही समजू शकत होतो, पण त्याचे आम्हाला काही* फारसे वाटले नाही. इतर लोकांना जे आज हरघडी भोगावे लागते ते वरच्या वर्गातील माणसाला एखादे वेळी भोगावे लागले तर त्यात तसे काय बिघडले? आम्ही श्रीवास्तवाना मात्र अगदी लोकसभेपर्यंत त्यांची तक्रार न्यावयाचे आश्वासन दिले. बाकी द्वितीयश्रेणी आरक्षित डब्यांना मुंबईच्या लोकलचे स्वरूप होते; पण त्यातही आम्हाला नवे काही नव्हते. दर दिवाळी—दसऱ्याला उत्तर भारतातील साऱ्याच स्टेशनवर आरक्षित डब्यात हाच प्रकार असतो. अगदी मधू दंडवते असतानाही सुरू होता; पण या गर्दीतही डब्यातील लोक तसे खुशीत होते फार काही पाहिले. एका मोठ्या नाटकात सामील झालो. जत्रेतहि भटकलो असा आनंद त्याच्या चेहऱ्यावर होता आम्हीही खूप दमलो होतो; पण किमान *त्या क्षणी तरी* आमची पण भावना तीच होती. आम्हाला रॅली अक्षरश चढली होती! ◻

## पाच

मेळावा भरला आणि संपला! या मेळाव्याने अनेकांना चकवले. खरे पाहता भोवतालच्या लोकाना अगदी नजीकच्या सहकाऱ्यानासुद्धा सफाईने चकवणे हा बाईंच्या राजकारणाचा तसा कणा आहे दिल्लीतील काही परदेशी वार्ताहर याला आता Ladies grace *असे म्हणतात. बाईंच्या मनात काय आहे हे भोवताली तरंगणाऱ्या* एकालाही तसे कधी समजत नाही. बाईंनी आपले शेवटचे पान खाली टाकेपर्यंत तिच्या विश्वासातील सारेच जण 'मया जितम्' च्या धुंदीत राहू शकतात.

— मेळावा भरण्यापूर्वीची गोष्ट विरोधी पक्षापासून आज अस्तित्वात नसलेल्या यूथ कॉंग्रेसपर्यंत अनेकानी अनेक खाजगीतले अंदाज व्यक्त केले होते विरोधी पक्षाच्या एका नेत्याने नव्हे तर कॉंग्रेस आयच्या तिकिटावर महाराष्ट्रातून निवडून आलेल्या एका खासदाराने बाई या मेळाव्यात अध्यक्षीय पद्धतीचे सूतोवाच करतील म्हणून विश्वासाने सांगितले होते.

मेळावा फारच मामुली स्वरूपाचा भरेल आणि झालेली अव्यवस्था काबूत आणता आणता आणि जमावाच्या थिल्लरपणाने होणारी बदनामी भरून काढताना नाकी दम येईल असाही अंदाज व्यक्त झाला होता आणि हाही अंदाज काही विरोधी पक्षाचा नव्हता— जगदीश टायटलर आणि त्याचे यूथ कॉंग्रेसचे निकटचे सहकारी यांचा हा अदाज होता! आणि त्याची तरी काय चूक? सजय नसतानाचे सोडा, सजय असतानाही गुंडागर्दी जमवावयास किती आणि कसा वेळ व पैसा लागतो आणि शेवटी त्यातूनही किती गर्दी जमते हे त्यानी अनुभवलेले होते. मेळावे संपवून परत जाताना जमवलेली बाळे रेल्वेत काय रंग उधळतात ते पण त्यांनी भोगले होते! त्यातूनही आपणाला संपूर्णपणे डावलून असे काही दिल्लीत होऊ शकते ते पण त्यांना समजत नव्हते, पचत नव्हते. टायटलर वगैरेंचे सोडा युवा कॉंग्रेसच्या या सर्व चण्याफुटाण्याच्या गर्दीत खुशवंतसिंग म्हणजे तसा बत्तासा! पण या मेळाव्यापूर्वी खुशवंतसिंगांशी मेळाव्याबाबत काही बोलावयाचा प्रयत्न केला तेव्हा फक्त सरदारजीलाच जमू शकेल अशा भाषेत त्यानी या मेळाव्यावर तोंड पाखडले.

शेवटी आपण सपत आहोत, संपलो आहोत याची जाणीव केवढी विलक्षण भेदक असते! या मेळाव्यानंतर एखाद्या विरोधी पक्षाने लिहावे तसे खुशवंतसिंगानी आपल्या महीसह 'हिंदुस्थान टाइम्स' मध्ये लिहिले 'या असल्या मेळाव्यामुळे फार पैसा उगाच खर्च होतो. लोकाचे दैनंदिन जीवन विस्कळित होते. आजारी माणसाना रुग्णालयात वगैरे न्यावयास त्रास होतो वगैरे वगैरे!' पण कॉंग्रेसचे नसलेल्या 'स्टेटस्मन'ने त्याच दिवशी *याला* उत्तर दिले होते स्टेटस्मनने लिहिले होते, हा एक आल्हाददायक अनुभव होता. एवढी प्रचंड गर्दी; पण किती शिस्तबद्ध! कॅनॉट प्लेसला नोकरीला जाणाऱ्या लोकांसाठी राजपथ सोडून इतर अनेक रस्ते मोकळे ठेवले होते. दिल्लीतील साऱ्या कचेऱ्या आणि कारखाने नेहमीप्रमाणे काम करत होत्या.' एक वरिष्ठ पोलीसअधिकारी म्हणाला, 'लोक पोलिसांना उगाचच नावे ठेवतात. खरे पाहता प्रत्येक छोट्या-मोठ्या मेळाव्याच्या वा सभेच्या वेळी कागदावर पोलिसांची व्यवस्थेची योजना इतकीच व्यस्थित व संपूर्ण असते; पण कोणत्या तरी क्षणी मोठी गर्दी हाताबाहेर जाते. सारी व्यवस्था कोलमडून पडते.' या वेळचे जमावाचे वागणेच तसे इंडियावाल्यांना अद्भुत होते. सामूहिक शिस्त ही खेड्यापाड्यात नकळतच रुजलेली आहे का? गुंडागर्दी, हुल्लडबाजी या लोकाच्या प्रकृतीतच वसत नाही का? तसे असावे. खरे बोलायचे तर युवा कॉंग्रेसचे सोडा, पण हुल्लडबाजी आणि नारेबाजी म्हणजेच सारे काही मानणाऱ्या इडियावाल्याना प्रथमच भारतीय जनता म्हणजे काय हे पहावयास मिळाले.

या मेळाव्याला किती आणि कसा खर्च आला हा तसा वादाचा प्रश्न आहे. आलेल्या माणसांपैकी अगदी एकानेही आपल्या खिशातला छदाम सुद्धा खर्च केला नाही हे पण एक अगदी उघड गुपित आहे. आलेल्या खर्चाचा अंदाज दहा कोटीपासून शंभर कोटीपर्यंत सांगितला जातो—खेड्यापाड्यातील लोकांच्यासाठी इतका खर्च झाला ही सुद्धा माझ्या मते तशी जमेचीच बाजू. मोठ्या कंपन्यांचे अधिकारी, कामगारांचे बोनस यावर या देशात केवढा प्रचंड पैसा खर्च होत असतो. नुसते पेट्रोलचे दर वाढले तर देशाचे पाच हजार कोटी रुपये परकीय चलनात जातात आणि तरीही रस्त्यावर वाहनांना जागा नाही; अशा गर्दीने महानगरात खाजगी वाहने असतात आणि तीस वर्षांपूर्वी खाजगी गाडी वा खाजगी वाहन माहिती नसलेल्या आम्हा लोकांना हे लागते. एक वेळ कोणत्याही कारणाने खेड्यातील काही लोकांच्यासाठी, त्यांना 'जिवाची दिल्ली' घडावी म्हणून अगदी शंभर कोटी रुपये खर्च झाले तरी काही बिघडत नाही हे किमान माझे तरी व्यक्तिगत मत आहे.

—असो ! हा मेळावा उत्स्फूर्त नव्हता. फार प्रयत्नपूर्वक जमवलेली ही गर्दी होती. नियोजनपूर्वक, काटेकोरपणे हे सारे आखलेले होते; पण म्हणूनही काही बिघडत नाही. दारासिंगच्या वल्लभभाई पटेल स्टेडिअमवरच्या साऱ्याच कुस्त्या अशा असतात. म्हणून त्याची रंगत काही कमी होत नाही. त्यातूनही काही कुस्त्या फसतात, काही नुसत्या चालतात. काही लोकांच्या कलेच्या व धंद्याच्या दृष्टीनेही जाम यशस्वी होतात. शवटी साऱ्याच नाटकाचे प्रयोग बसवलेले असतात. तरीही आपण ते पहातो आणि त्याचे कौतुक करतो. त्यातूनही प्रयोगाच्या वेळी एखादा प्रयोग कळत-नकळत फार वरची पातळी गाठतो.

या नाटकात फक्त एक ठरलेला नट आला नाही. राजीव मेळाव्यात भाषण देईल, किमान व्यासपीठावरून दर्शन देईल, असा अंदाज नव्हे विश्वास मेळाव्याच्या संयोजकांचा होता, विरोधी पक्षाचा होता, युवा काँग्रेसचा पण होता; पण त्या दोन भावात दोन ध्रुवांचे अंतर आज तरी दिसत आहे. राजीव राजकारणात उतरणार यात तसा दिल्लीत आज कोणालाच संदेह नाही; पण त्याची सारी पद्धतच भावापेक्षा वेगळी असेल. तो व्यासपीठावर गेला नाही; पण त्याने झाडून साऱ्या छावण्यांना भेट दिली. शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या प्रमुखांशी तो बोलला.

—पण मग या नाटकाचे प्रयोजन काय होते आणि त्याची फलश्रुती काय हा आपला पहिला प्रश्न असून तसा बाकी उरतोच. त्याला दोन-तीन उत्तरे संभवतात.

—पहिले म्हणजे, राजीवने पुढे-मागे आपल्या वाटेत वजीर बनून आडवे येऊ शकणारे, आपली वहिनी मनेका हिचा झेंडा खांद्यावर घेऊन पुढे येणारे, खुशवंतसिंग, युवा काँग्रेस वगैरेंचे प्यादे निकालात काढले. आता हे प्यादे राजीवने संपवले की राजीवला वापरून मध्यंतरी दूर फेकले गेलेल्या काँग्रेसमधील जुन्या जाणत्या लोकांनी हे केले हे समजावयास आणखी काही काळ थांबावे लागेल.

दुसरे आणि महत्त्वाचे म्हणजे विरोधी पक्षाला काही काळ तरी भोवळ यावी असे इंदिराबाईंनी त्यांना आपल्या सामर्थ्याचे, जनमानसावरील आपल्या पकडीचे, आपल्या संघटनाकौशल्याचे आणि आपल्या वेठीला असलेल्या अमाप साधनसंपत्तीचे दर्शन घडवले. शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न हातात घेऊन, आपल्याला रस्त्यात गेऊन गाठणारा एखादा राजकीय नेता आणखी काही काळ तरी उभा राहू शकणार नाही, याचा त्यांनी बंदोबस्त केला.

—पण फक्त एवढ्या दोन-तीनच गोष्टी घडल्या का ? मला असे वाटले नाही. माझ्याबरोबरच्या माझ्या मित्रांनाही असे वाटले नाही. म्हणजे असे—नेहमी फक्त इतरांनाच धक्के देणाऱ्या खुद्द बाईंनाच या मेळाव्याने काही धक्का दिला का ?—सभेच्या सुरुवातीला बाईंचा गळा इतका दाटून का आला ? सभेत ज्याला खरोखर किंचाळणे म्हणावे असा बाईंचा आवाज टिपेला का पोचला ? कोणत्या कारणाने झालेले कृष्णाचे 'विश्वरूपदर्शन' कोणाही संमोहित अर्जुनाचा भ्रमनिरास करावयास पुरेसे असते. ही संख्या, ही शिस्त, आपल्या प्रश्नाची या लोकांना हात असलेली पहिलीवहिली जाणीव. राजकारणात मुरलेल्या बाईंना हा पहिलावहिला हुंकार देणारा ज्वालामुखी नक्कीच जाणवला असेल !

भाषणात शरद जोशी वा कांदा आंदोलन याचा त्यांनी एकदाही उल्लेख केला नाही; पण नाव न घेता तसे बाईंनी हे सारे सांगितलेच की ! किसानांचे वेगळे आर्थिक प्रश्न आहेत हे त्यांना मान्य केले. कपास आणि गन्ना यांचे दर वाढले आहेत आणि ते आणखीही वाढले पाहिजेत म्हणून सांगितले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शहर आणि खेडी असा लढा उभा राहू नये म्हणून शेतकऱ्यांना भावनात्मक आवाहन केले– 'शेतकऱ्याला तीन मुलं असतात. एक शेतात, एक कारखान्यात, एक सीमेवर. सारा देशच शेतकऱ्यांचा आहे—खाली मैं हूँ एक बदनसीब जो किसानकी बेटी नही' असे म्हणेपर्यंत हे भावना हलवणारे आवाहन गेले.

कारण आपल्या सामर्थ्याचे व राजकीय कौशल्याचे प्रदर्शन करून विरोधी पक्षांना आपण थांबवू शकू. शेतकऱ्यांची पण काही काळ दिशाभूल करता येईल; पण एक संपूर्ण समाज ढवळून काढणारा, प्रचलित घडी मोडीत काढणारा, नवा आर्थिक विचार या मार्गाने संपवता येणार नाही हे त्यांना जाणवले आहे.

आणि हे सारे सांगितल्यावर एक गोष्ट उरतेच. विचाराचा मुकाबला जसा विचाराच्या पातळीवर करावा लागतो तसाच विचाराचा प्रचार आणि प्रसारही विचाराच्या पातळीवरच करावा लागतो. जाणीवपूर्वक, नियोजनपूर्वक, निष्ठापूर्वक व्हावा लागतो. विचार ही आग असली तरी ती वणव्यासारखी आपोआप पसरत नाही. संघाची पठडीतील बौद्धिके, गांधीजींची सूतकताई आणि साम्यवाद्यांची अभ्यासमंडळे म्हणूनच जरुरीची असतात. शवटी शेतकऱ्यांचे ज्वलंत वेगळे आर्थिक प्रश्न आहेत. या देशात त्यांच्यावर कळत-नकळत अनेक दशके फार मोठा अन्याय होतो आहे. त्यांच्यावर काही अक्सीर उपाय आहेत, हा एक नवा तर्कसंगत शास्त्रशुद्ध विचार आहे. या विचारावर निष्ठा असलेले लोक हा विचार सर्व भारतभर, सर्वसामान्य शेतकऱ्यांजवळ किती झपाट्याने आणि किती प्रभावीपणे पोचवणार हा खरा प्रश्न आहे आणि आज तरी या विचाराजवळ असा काही भारतव्यापी कार्यक्रम आहे असे दिसत नाही. त्यांच्याजवळ असा काही भारतव्यापी कार्यक्रम असणे हीं काळाची गरज आहे. नाही तर असले डोळ्यांचे पारणे फेडणारे मेळावे भरवून वा दिंड्या काढून भारतीय शेतकऱ्यांची आपण आणखी काही दशके तरी सहज दिशाभूल करू शकू हे इंडियावाल्यांनी त्यांना दाखवून दिलेय ! ☐

पुस्तके

# आराधना

## शक्तिसंपन्न सूर्याची

जगाच्या इतिहासामध्ये मानवाला अनादि कालापासून एकाच गोष्टीचा सदोदित ध्यास आहे. शक्ती, ताकद म्हणजेच ऊर्जा ! गेली शेकडो–हजारो वर्षे या शक्तीचे वेगवेगळे प्रकार, उपयोग शोधण्यास आणि त्यावर प्रभुत्व गाजविण्यासाठी त्याची अहर्निश धडपड चालू आहे. या शक्तीवर, शक्तिस्रोतांवर आपले नियंत्रण रहावे म्हणून त्याने असंख्य युद्धे केली आहेत.

'शक्ती' अथवा 'ऊर्जा' या शब्दाची शास्त्रीय व्याख्या आहे – कार्य करण्याची क्षमता–आणि ती वेगवेगळ्या प्रकारातून प्राप्त होऊ शकते. कोळसा, तेल, जलशक्ती, औष्णिक विद्युत...आणि आता सौरशक्ती... म्हणजेच सूर्याच्या किरणांपासून, उष्णतेपासून वेगवेगळ्या प्रकारानी, विविध प्रक्रियानी मिळविलेली शक्ती !

आज जगात सर्वत्रच टंचाई आणि भाववाढ यांच्या दुष्टचक्रात माणूस अडकलेला आहे. पैशाची क्रयशक्ती कमी होत आहे म्हणजेच जीवनोपयोगी वस्तूचे भाव वाढत आहेत...अन्नधान्य, कापड, यंत्रसामुग्री, उपकरणे आणि इतर बरेच काही...

परंतु या सर्वांवर ताण करणारी आणि एक प्रकारे सर्वच जगाला एका सततच्या धाकाखाली, ताणाखाली ठेवणारी आहे तेलाची भाववाढ ! याचे आर्थिक कारण असे की, जगातील तेलसाठे मर्यादित आहेत आणि मुख्यत्वे एकाच राष्ट्रगटाच्या अधिकाराखाली केंद्रित आहेत. ओपेक गट. याउलट जगाची तेलाची भूक सतत वाढत आहे, वाढणार आहे. याला कारण म्हणजे सर्वत्र झपाट्याने होणारे औद्योगिकीकरण. उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक, करमणूक प्रत्येक क्षेत्रात प्रतिदिनी दरडोई अफाट प्रमाणावर ऊर्जेचा वापर होत आहे. वेगवेगळ्या स्वरूपात.

ही ऊर्जा, तिची साधने, त्यांची मर्यादित उपलब्धता यामुळे उभ्या राहणाऱ्या समस्या आणि त्यांना पर्यायी उपाय याचा मराठीमधून परामर्श घेणारे पुस्तक म्हणजेच रमेश के. सहस्रबुद्धे यांचे नवीन पुस्तक, 'उद्याची आशा, सूर्यशक्ती.'

अगोदरच मराठीमधून शास्त्रीय विषयावर लेखन फारसे होत नाही आणि क्वचित झालेच तर ते फारसे वाचलेही जात नाही. याकरताच या पुस्तकाचे महत्त्व जास्त वाटते. कारण त्यामधील नवीन क्लिष्ट विषयाची फोड करतानाच त्यातील रंजकतेचेही भान बऱ्याच अंशी साभाळण्यात सहस्रबुद्धे यशस्वी झाले आहेत.

कोळसा, तेल, जलविद्युत...अगदी अणुवीज ही सर्वच ऊर्जासाधने त्यामानाने मर्यादित आहेत...आज ना उद्या पण भविष्यकाळात निश्चितपणे संपुष्टात येणारी आणि सध्या आहे या वेगाने त्याचा वापर वाढत चालला तर ती वेळ काही फारशी लाब नाही. कदाचित या शतकाच्या शेवटीच या समस्येने फारच उग्र रूप धारण केलेले असेल आणि म्हणूनच हे नक्की काय गौडबंगाल आहे हे सर्वांनाच समजावून सांगण्याची आवश्यकता आहे.

'सूर्यशक्ती' हे ऊर्जासमस्येचे एक प्रभावी उत्तर म्हणून लेखकाने या पुस्तकात प्रतिपादन केले आहे आणि ते शभर टक्के खरे आहे. जगाला अत्यंत विपुल प्रमाणात फुकट आणि हमखास मिळणाऱ्या सूर्यप्रकाशाचा आणि सूर्याच्या उष्णतेचा उपयोग करून घ्यावयाची कल्पना तशी फारशी नवीन नाही. सुमारे अडीचशे वर्षांपासून तसे प्रयोग फ्रान्समध्ये आणि इतरत्र तुरळकपणे चालू होते; परंतु गेल्या ३–४ दशकामध्ये इतर इंधनांचा प्रश्न गंभीर बनून त्यात राजकारणाची भर पडल्याने जगातील सर्वच राष्ट्रांचे लक्ष या सूर्यशक्तीकडे वेधले गेले. नव्हे तसे ते अपरिहार्यच होते.

अणुशक्ती हा शक्तीचा सर्वांत नवीन सापडलेला स्रोत; परंतु अणुशक्तीसाठी लागणारी युरेनियम थोरियम (संस्कारित) प्लूटोनियम आदि द्रव्ये नैसर्गिक (अथवा कृत्रिम) मर्यादित प्रमाणातच उपलब्ध आहेत; परंतु सूर्यापासून मिळणारी उष्णता केवळ प्रचंड आणि शब्दशः अनंत आहे. दर दिवशी दर चौरस सेंटिमीटरमागे सूर्यापासून पृथ्वीला ३,६७० परार्ध ओहम् (अबब!) उष्णता मिळते आणि यापैकी जवळजवळ काहीच वापरली जात नाही. भारतात असणाऱ्या थरच्या वाळवंटातील शंभर चौरस मैल (१०x१० मैल) एवढ्याशा तुकड्यावर फक्त एक दिवस पडणाऱ्या सूर्याच्या औष्णिक शक्तीवर संपूर्ण भारतातील कारखाने महिनाभर सहज चालू शकतील. आहे की नाही फायदेशीर उद्योग ? आणि हे सर्व अगदी फुकटात ! शास्त्रज्ञांच्या मते सूर्य कमीत कमी ५०० कोटी वर्षे सहज जगेल ! अर्थात नेहमीप्रमाणेच यावरही मतभेद आहेत; परंतु ही गोष्ट फार फार लांबची !

आता ही एवढ्या अजस्त्र प्रमाणात दररोज पृथ्वीवर आढळणारी व तितक्याच प्रचंड प्रमाणात वाया जाणारी सौरशक्ती उपयोगात आणावयाची कशी ? त्याचकरता सर्वत्र प्रयोग चालू आहेत. हे कार्य साधारणत तीन प्रकारे केले जाते :

१) सौरविद्युतघर : यामध्ये काही सिलिकॉनसारखी रासायनिक द्रव्ये वापरून प्रकाशकिरणाचे रूपांतर थेट विजेमध्ये केले जाते. सध्याची अंतराळयाने याच शक्तीचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करतात.

२) औष्णिक विद्युतशक्ती : सूर्याच्या उष्णतेचा उपयोग एका वेगवेगळ्या दोन धातूंच्या जोडपट्टीवर करून त्यायोगे विद्युन्निर्मिती करणे.

३) औष्णिक रूपांतर : ही त्यामानाने नवीन आणि अजूनही प्रायोगिक अवस्थेत असणारी पद्धत असून त्यामध्ये सूर्यशक्तीचा उपयोग ऋणभारित परमाणूचा प्रवाह निर्माण करून वीजनिर्मिती करण्यासाठी केला जातो.

या सौर-विजेचा उपयोग अंतराळयानापासून ते स्वयंपाकघरापर्यंत, वाहने चालविण्यापासून एअरकंडिशनिंगपर्यंत आणि संदेशवाहनापासून ते शेतीपर्यंत सर्वत्र केला जाऊ शकतो. मात्र अजूनही हे सर्वच बाल्यावस्थेत आणि बरेच खर्चिक आहे. यावर पुरेसे संशोधन झाल्यावर शक्तीचा एक अल्पमोली आणि चिरंतन स्रोत खचितच मानवाच्या हाती लागेल.

उण्यापुऱ्या १०४ पानांच्या या पुस्तकामध्ये सौरशक्ती म्हणजे काय, ती कशी तयार करतात इथपासून ते तिचे उपयोग, त्यासंबंधी चाललेले संशोधन आणि देशात व इतरत्र त्याबाबतीमध्ये केलेली प्रगती या सर्वांचे विवेचन सहस्रबुद्धे यांनी. केले आहे.

आधीच विषय शास्त्रीय म्हणजेच किचकट आणि त्यातसुद्धा नवीन म्हणून फारसा न हाताळलेला, त्यामुळे असा विषय समजावून सांगणे (त्याकरता इतर मराठी वाङ्मय उपलब्ध नसताना) आणि वाचकाचे कुतूहल त्यामध्ये शेवटपर्यंत राखणे हा अतिशय अवघड प्रकार; परंतु ती कसरत सहस्रबुद्धे यानी बऱ्यापैकी यशस्वीरीत्या केली आहे असेच म्हणावे लागेल

सहस्रबुद्धे यांनी इतरही शास्त्रीय लिखाण केले असून त्यावर त्यांची भाषणे व चर्चाही होतात; परंतु या पुस्तकात त्यानी हाताळलेला विषय एकदम नवा आहे, ताजा आहे. तरीही सर्वसामान्य वाचकाला – अगदी इंग्रजीही, मग मराठीचे काय घेऊन बसलात? अपरिचित आहे. यातील ठळक दोष काढावयाचेच म्हटले तर ते पुढीलप्रमाणे दाखविता येतील...एक म्हणजे क्लिष्ट, न रुळलेल्या मराठी प्रतिशब्दांचा अट्टाहासाने प्रयोग –उदाहरणार्थ उद्जन (हैड्रोजन), वर्णातु (क्रोमियम) इत्यादी मूळ द्रव्यांची नावे. ही नावे इंग्रजीत पटकन कळतात...त्याचप्रमाणे, पुस्तकातील मजकुराच्या मांडणी-मध्ये बऱ्याच विषयांची, प्रक्रियांची झालेली पुनरावृत्ती. या दोन्ही गोष्टी टाळता आल्या असत्या तर हे माहितीपूर्ण पुस्तक निःसंशय अधिकच वाचनीय बनले असते.

परंतु एक गोष्ट याबाबतीत निश्चितपणे लक्षात ठेवली पाहिजे की एका शास्त्रीय, सामान्यत. अपरिचित आणि इतर साहित्य उपलब्ध नसणाऱ्या विषयावर एक माहितीपूर्ण पुस्तक लिहिण्याचा हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे.

—प्रभाकर खोले

उद्याची आशा—सूर्यशक्ती
ले. रमेश के. सहस्रबुद्धे
प्र. अनिरुद्ध साहित्य, पुणे
कि. बावीस रुपये.

फिनिक्स निवड

# The Third Wave

The Revolution that will change our lives)
By Alvin Toffler--
Macmillan, Pages 544.

नावावरून बोध होत नाही काही पुस्तकाचा म्हणून आम्ही अलीकडे शक्यतो व जरूर असल्यास पुस्तकाच्या 'टायटल चा अर्थ डिक्शनऱ्यांतून किंवा एनसायक्लॉपिडिआतून काढून आमच्या वाचकाला तयार देतो. पुस्तकाच्या आत, उदाहरणार्थ–फाल्कनर, रॅगटाइम. अलीकडे रोजच्या कटकटीतून डिक्शनऱ्या व विश्वकोष बघायला फारसा वेळ कुणाला नसतो. मला एकदा एका वाचकाने अशाच एका टायटलचा अर्थ विचारला तेव्हा मला ही कल्पना सुचली. नेहमीप्रमाणे फिनिक्सच्या रसिक व चोखंदळ वाचकांना ती एकदम आवडली. बरेचसे फिनिक्सचे वाचक इतके चांगले आहेत की ५–७ व लाइफ मेंबर्स-फीचे हजारो रुपये टेबलावर ठेवून पावतीही मागणार नाहीत! काही वाचक कात्रणे आणून देतील. काही पुस्तकाविषयी माहिती देतील. हे वाचक इतक्या चांगल्या तऱ्हेने वागतात की 'माणूस' मधील एका ग्रंथपालाचा कॅथार्सिस ...' सारखा लेख लिहून मला अपराध्यासारखे वाटू लागते. अशा वाचकासाठी अजून पुष्कळसे करायचे आहे. चलनफुगवट्यामुळे काय होते कुणास ठाऊक, मला असे भरभरून देणारे वाचक मिळूनही मी ग्रंथालय संकल्पानुसार वाढवू शकत नाही. ग्रंथखरेदी, अमेरिकन मासिकाच्या वर्गण्या, प्लॅस्टिक, कात्रणे, पुस्तके ठेवायची कपाटे, कर्मचाऱ्यांचा पगार, किरकोळ खर्च हे सारे काही असे बॉटमलेस पीट सारखे असते की सहस्र रुपये त्यात हा हा म्हणता गायब होऊन जातात आणि वरवर दिसते काय? तर 'चार पुस्तकाची ला.. य...ब्र . री !'

आता या पुस्तकाच्या नावाच्या संदर्भात थोडसं. निदान त्याला 'सबटायटल' आहे म्हणून बोध होतो; पण मग आपल्या मनात शंका निर्माण होते फर्स्ट आणि सेकंड वेव्ह कोणत्या? एल्विन टॉफ्लरच्या मते या (टॉफ्लर हे 'फ्यूचर शॉक' वाले) पृथ्वीला तीन 'लाटांनी' झोडपले. मानवजातीचा समग्र इतिहासच टॉफ्लर यानी तीन लाटात विभागला आहे. पहिली लाट म्हणजे शेतीची. जेव्हा माणसे रानटी अवस्था सोडून पीक वगैरे काढायला लागली ती. चाक (industrial revolution) आलं ती दुसरी वेव्ह आणि टॉफ्लरना वाटतं की, आता गोदो (सॅम्युएल बेकेटफेम) येणार आहे ती तिसरी वेव्ह चीप्स (computers) गिमिक्स, गॅजेटस गोदोनी नुकतेच पाठवलेत. ती त्याच्या आगमनाची चाहूल. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर जग कसं झपाट्यानं बदलून गेलं ते सर्वांना माहीत आहेच. आता कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीमुळे सुद्धा जग परत एकदा वेगळ्याच दारावर थाप मारू लागले आहे. या दाराच्या मागे थर्ड वेव्ह आहे. दार उघडले की थर्ड वेव्हचा तडाखा सर्वांना बसणार आहे व जीवन पार पालटून जाणार आहे!

तसे पाहिले तर हे पुस्तक वाचून एल्विन टॉफ्लर हे प्रोफेट ऑफ डूम किंवा प्रोफेट ऑफ युटोपिया आहेत असे वाटत नाही. त्यानी फक्त कार्डस टेबलावर ठेवली आहेत व काही शक्यता दाखवल्या आहेत.

असली पुस्तके वाचून आपण हे सर्व बघायला अजून जिवंत आहोत याबद्दल बरे वाटते. हा गोदो आणखीन काय काय पाठवील बरं? ते बघून मरावं असं सारखं काही मरणोन्मुख माणसाना वाटत असतं. गंभीर आजारी पडाल तेव्हा गोदोची आठवण काढा व आपल्या इच्छाशक्तीला जोम आणून लवकर बरे व्हा!

सारे एका विस्तीर्ण पटांगणावर जमा झाले आहेत. एकच हिरवेगार झाड आहे. त्यावर तर मुग्याच मुग्या! पटांगणाच्या कडेला एकच टेकडी आहे. चांगले दृश्य पहाता यावे म्हणून त्यावर तर इतकी गर्दी आहे की तिथे मुंग्या-नाही थारा नाही! पटांगणावरील लोकाना वाटत आहे की, झाडावरच्या गर्दीमुळं फांद्या तुटतील 'मरू द्या भडव्याना! चांगला व्हायू हवा आहे ना! आणि शिवाय गारवाही!' झाडावरच्या लोकाना वाटलं, 'ही राडीची मुलं थव्या-थव्यानं टेकडीवर चढली.

पडेनात एकमेकाचा धक्का लागून कड्या-वरून खाली! काही निश्चितच मरतील. अनेक घायाळ होतील. आमच्यापेक्षा क्लिअर व्ह्यू हवाय लेकाना!'

टेकडीवरच्या लोकाना वाटलं, 'पेललं तरी असतं का थेरड्याना इथं यायला? साले खालून केकाटतात!'

इतक्यात एकच गल्ला सुरू झाला. टाळ्यांच्या आवाजानं आसमंत गाजून उठलं. लांब-लाबच्या पर्वतामागून क्षितिजावर एक अक्षर दिसायला लागलं. हे दृश्य पाहण्या-करिता तर गर्दी झाली होती 'तो पहा 'गो' दिसत आहे!' एक जण ओरडला.

'आता 'द' ही आला,' दुसरा किंचाळला, "'द' चा 'दो' होणार. निश्चित!" त्याला राहवेना. टाळ्यांच्या जोडीला शिट्ट्या वाजायला लागल्या.

इतक्यात आकाशात एकाएकी ढग जमले. त्यातील एका काळ्याकुट्ट मेघाने मशरुमचा आकार घेतला. तो आकार अक्षराच्या व लोकाच्यामध्ये आला व 'द' चा 'दो' झालाच नाही! मशरुम जैसे-थे परिस्थिती बाळगून होता. मुग्ध असलेल्या झाडाचं एकही पान हालेनासं झालं. वारा पडला. ऐन सकाळच्या वेळेला वातावरणात एक विलक्षण खिन्नता पसरली. Endogenous. महासागरी जन-समुदाय एका माणसासारखा मौन झाला. पटांगणावरचे दयनीय नजरेने झाडावरच्या-कडे बघू लागले. झाडावरचे तशाच नजरेने, जणू सॉरी म्हणत, टेकडीवरच्या लोकाकडे बघू लागले. टेकडीवरचे वर्तुळ पूर्ण करण्या-साठी भकास नजरेने पटांगणाकडे पाहू लागले.

थोड्या वेळानं टोळक्यात थोडीशी कुजबुज सुरू झाली. "हा साला गोदो भलताच घातकी आहे. आपल्याला अमके गॅजेटस पाठवील, इतर गिमिक्स देईल व नतर निरोप देईल की, तो येतोय्, येतोय् आणि तेवढ्या-तच आपल्या मुस्कटात ठोकून देईल!"

हे पुस्तक नावाप्रमाणेच तीन वेव्हसमध्ये विभागले आहे. दुसरी टायडल वेव्ह पहिली-पेक्षा मोठी असते व तिसरी दुसरीपेक्षा मोठी असते. तसेच या पुस्तकाचे भाग आहेत. सेकंड वेव्हमध्ये सुमारे ३६ विषयावर माहिती आहे, तर थर्ड वेव्हमध्ये सुमारे ७२ विषय हाताळले आहेत. शेवटच्या 'कन्क्लूझन' या विभागातही काही विषय आहेत. यावरून पुस्तकाच्या व्यापकतेची कल्पना येईल!

अमेरिकेत पूर्वी लाबच लाब व वजनाने भारी अशा मोटारी होत्या. अजूनही काही आहेत. त्या पेट्रोल फार पितात म्हणून त्याना 'गॅस गझलर्स' म्हणतात. 'टाइम' मासिकाने यापासून क्यू (cue) घेतला व श्री. एल्विन टॉफ्लरच्या पुस्तकाला 'The Third wave is a 544–page pulp guzzler. Definitely a throwback to the Second Wave' असे म्हणून पुस्तक निकालात काढून टाकले.

टॉफ्लर हे जगप्रसिद्ध 'फॉर्च्यून' मासिकाचे संपादक आहेत किंवा होते म्हणून तर एक प्रतिस्पर्धी या नात्याने 'टाइम'ने ही टीका केली नसेल ना, अशी शंका मनात येऊन जाते.

काही दिवसांपूर्वी 'टाइम्स ऑफ इंडिया' मध्ये सोमवारच्या सदरात एक छोटीशी बातमी आली होती. 'थर्ड वेव्ह' व कार्ल सागनचे 'ब्रोकाज ब्रेन' या दोन पुस्तकाचा उठाव मुंबईच्या पुस्तकीय बाजारात बराच आहे असा त्यातील आशय होता. कार्ल सागन याच्या पुस्तकाचाही एकूण सूर गोदोचे आगमन होणार आहे असाच आहे; परंतु या दोन्ही लेखकांनी असेही कबूल केले आहे की, आताचा काळ व गोदोच्या आगमनाच्या दरम्यान मशरुम ढगाच्या आण्विक आतष-बाजीमुळे किंवा प्रदूषण व तत्सम कारणामुळे मानवजात सहज नष्ट होऊ शकेल!

एल्विन टॉफ्लरने हाताळलेले विषय बरेच 'डाउन-टु-अर्थ' आहेत. अक्षरशः तर कार्ल सागनचे विषय ऐहिक (earthly) व 'कॉस्मिक' ही आहेत.

टॉफ्लरच्या पुस्तकात एक चागलेच वाच-नीय प्रकरण आहे. 'गांधी विथ सॅटेलाइटस'. या प्रकरणात न्यू दिल्लीजवळील एक धंदे-वाले श्री. जगदीश कपूर यांनी दहा वैराण एकरांची जागा सौरशक्तीने कशी पालटून टाकली याचा उल्लेख आहे. कपूर यांचे हे सोलर फार्म जगभर मशहूर आहे असे या पुस्तकात टॉफ्लरनी म्हटले आहे. मला मात्र त्याची माहिती नव्हती!

साम्युएल बेकेटचा गोदो येवो अगर न येवो, पण त्याआधी ही दोन्ही पुस्तके वाचून काढलेली बरी. दोन्हीही वाचनीय आहेत. फिनिक्समध्ये आली आहेत.

—जे. एन्. पोंडा


**Some suggestions about reading**

- ☐ Read by rotation.
- ☐ That is, do not read the same author and the same subject one after the other.
- ☐ In this way, whet and sharpen your reading appetite.
- ☐ Switch over from English to Marathi & vice versa often.
- ☐ Select your own book and subject by trial and error method.
- ☐ Do not look down on mysteries and thrillers! They are the spice of life! Even Bertrand Russel, Churchill and Kennedy read mysteries and thrillers.
- ☐ Read regularly everyday–lest you get out of the habit of reading.
- ☐ If you have distaste for reading, read artistically preserved book at–

**The Phoenix Library**
Opp. Sadashiv Post, PUNE 411 030.

हिंदी चित्रपट

# हम पाँच

## अफाट कल्पनादारिद्र्य

जिकडे पहावं तिकडे अत्याचार, अन्याय. स्त्रीवर अन्याय, दलितावर अन्याय. लोकशाहीची मळं हलतात तर हुकूमशाही डोकं वर काढतीय बागपत-बेलचीचे अन्यायाचे पडसाद उमटताहेत. मग सुरिंदरकपूर काय स्वस्थ बसतील? त्याना या साऱ्या घटनाचे महाभारताशी असलेले 'कनेक्शन' लक्षात येते. शिवाय एवढ्या साऱ्या घटना, एवढे सारे विषय एका कथेत सापडतील तर तीच कथा—महाभारताची कथाच—का मांडू नये? मग झालं कौरवाचा उन्मत्तपणा, पांडवावरचा अन्याय, कृष्णशिष्टाई, प्रत्यक्ष युद्ध. द्रौपदीवस्त्रहरण, लाक्षागृहदहन, अखेर दानवदुष्टसंहारकर्त्या कृष्णाचा, पाडवाचा म्हणजे सत्याचा विजय या गोष्टीना आधुनिक पेहराव दिला वाढता वाढता होणारी होणारी वाढ प्रसगी भूमंडळालाही वेढते याची खुद्द व्यास—महर्षींनाही कल्पना आली नसेल! त्यानी जय नावाचा इतिहास गणपतीला डिक्टेट केला खरा; पण त्या इवल्याशा स्क्रिप्टचे अखेर अक्षरशः महाभारत झाले! सौती वगैरेंच्या लायनीत आपले सुरिंदरकपूर बसलेच. बापू नामक दिग्दर्शकाला वेठाला धरून महाभारताच्या इतिहासाला नव्याने घडवले त्याची कहाणी म्हणजे 'हम पाँच'

कथा सांगायच्या आधी थोडीशी पात्रयोजनेची कल्पना आली म्हणजे आणखी सोपं जाईल. ती येणेप्रमाणे—

महावीर व स्वरूप या नावांचे नकुल-सहदेव (उदयचंद्रा—गुलशन ग्रोव्हर), भीमा (मिथुनचक्रवर्ती), अर्जुन (राजबब्बर) सूरज (नासिरुद्दीन शाह) हे पाडव मूळ कथेप्रमाणे सगेभाई नाहीत तर एकाच गावातले अन्याय-पीडित आहेत. यातील अर्जुन व जमीनदार प्रतापसिंह (अमरीशपुरी) हा दुर्योधन यांचे नाते म्हणजे कृष्ण—कंसाचे आहे. हा जमीनदार सारे अत्याचार करण्यात पटाईत साक्षात सर्व दुर्गुणाचा पुतळा! ते दुर्गुण सागायला नकोत. त्याची एक शिकार म्हणजे सुदरिया (शबाना आझमी). ही या कथेतल्या नकुल-सहदेवाची बहीण. या जमीनदाराचा भाऊ कृष्ण (संजीवकुमार) मूळ कथेतल्या कृष्णासारखाच. दुष्टाविरुद्ध शस्त्रधर म्हणून सागणारा. कृष्णशिष्टाई वगैरे मुत्सद्देगिरी करणारा; पण कृष्ण म्हणून जे समोर येतं त्याच्या दुसऱ्या टोकाचा. भलंमोठं पोट, धोतराचा सोगा सावरीत, काश्मीरी शालीचं टोक जमिनीवर लोळवीत व एक बोतल बगलमें लिया फिरता हुआ.

भीमावर लट्टू असलेली लजिया (दीप्ती-नवल) मात्र फक्त भीमाच्याच मालकीची. वस्त्रहरणाचा प्रसंग येऊनही हम पाँचोंकी नसलेली द्रौपदी. जमीनदाराचा चमचा (कन्हैयालाल) शकुनीमामा व जमीनदार-पुत्र कुंवर (रूपेश कुमार.)

आता हे व असे किरकोळ फेरफार लक्षात घेतले तर कथा चतुरांच्या ध्यानी आली असेलच जमीनदाराचे अन्याय, ह्या पाच जणानी कृष्णाच्या मदतीने दिलेला लढा अन् अखेर यदा यदाहि धर्मस्य ..

आता जमीनदार म्हणजे हुक्काचे प्याले आले. इशारा करताच येणारे पहेलवान आले. ज्युडो कराटेतले पाडवांचे प्राविण्य आले. शुभ्रटेरीन साडीतली मजबूर कुंती आली. शिवाय इथला कृष्ण प्रसंगानुरूप गाणी म्हणतो तर भीमा लजिया यांचे द्वंद्वगीत, पाच पांडवाचं शकुनीमामाची धिंड काढताना म्हटलेलं कोरसगीत, खेरीज एक कॅबरेगीत ओघानेच आलं.

धड ना करुण—ना विनोदी अशा अवस्थेत आपण केविलवाणे होऊन बसलो असता बच्चेलोक मात्र 'तालियाँ बजाओ'च्या इशाऱ्याची वाट न बघता टाळ्या वाजवत असतात. चित्रपट असाच बेतला आहे की, वेगाने संपावा, हेच आपले भाग्य. यातले पाडव तर खदे आहेत; पण जमीनदाराचं काम केलेला, सिंहासारखा चालणारा, दगडी चेहऱ्यातून बोलणारा अमरीशपुरी 'हम पाँच'ना खाऊन टाकतो अगदी कृष्णासह! (माफ करना हरिभाई!)

नासिरुद्दीन शाह, मिथुन चक्रवर्ती अन् मुख्य म्हणजे शबाना कमाल करतात; पण आपण एकूण त्या आधुनिक/पौराणिक कथेच्या पिळात एवढे जाम असतो की बिचाऱ्यांचं कौतुक करायला आपल्यात त्राण नसतं. तीच खुद्द भली भली भाषणं पाठ करण्यात अन् उरलेल्या वेळात ज्युडो करता करता जेरीला आलेली स्पष्ट दिसतात तिथे आपला काय पाड! आता दीप्ती नवलसारख्या अभिनेत्रीनं नुसतं छान दिसावं, बाहुलीसारखं नाचावं यापेक्षा आणखी वाईट ते काय?

विविध भारती, सिलोन वगैरे माध्यम गाणी लोकप्रिय करण्याचं काम करतील; पण लक्ष्मीकान्त प्यारेलालच्या अफाट दळणशक्तीचे कौतुक केल्याविना राहवत नाही.

पाश्चात्याकडून उचलेगिरी करण्याचं धड कसबही नाही, आपल्या चागल्या गोष्टीचं धड ज्ञान नाही. एखाद्या गोष्टीचे मनोरंजनासाठी, विनोदासाठी विडंबन करण्याची पात्रता नाही अशा अवस्थेतले आपले चित्रपटकर्ते केवळ ठराविक मसाल्यानी चित्रपट चटपटीत कसा होईल याच्या मागं. आपलं कल्पनादारिद्र्य चांगल्या तंत्रज्ञानामुळं, उत्तम अभिनेत्याच्या कष्टामुळं आणखी उघडं पडतं.

'टेन कपाडमेन्ट्स्'चे सेटस्, पौराणिक कथेची माडणी, त्याला यशस्वी करणारे त्याचे एकवीस आर्ट डायरेक्टर्स, त्याचे कलाकार आठवले की आपली दिवाळखोरी आणखी जाणवते. महाभारतासारख्या कथेवर असा चित्रपट निर्माण करण्याची प्रेरणा आपल्यात का होऊ नये? जाऊं दे!

'संभवामि युगे युगे' म्हणणारा कृष्ण अवतरू दे केव्हाही बापडा! आपल्या फिल्मवाल्यानी आणलेली ग्लानी पाहता त्याची आता फार गरज आहे असल्या भ्रष्टबुद्धीना धडा शिकवण्यासाठी, अन् पदरमोड करून त्याचे हात बळकट करणाऱ्या आमच्यासाठीही!

तर देवा, आता वेळ नको

—सुलभा तेरणीकर

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)




# आता आम्ही 'छायागीत' घरीच बघतो...

हो! परवांच आम्ही टी.व्ही. घेतला. लग्नाच्या वाढदिवशी ... मुलांचा हट्ट आणि ह्यांची आवड यांची सांगड शेवटी मी घातली. दरमहा शिलकी रकमेतून बँक ऑफ महाराष्ट्रमधे एक आवर्त खातं उघडलं. वर्षाच्या शेवटी जमा रक्कम अधिक व्याज हातात आलं, आणि मग काय...टी.व्ही. घरांत।

## आवर्त ठेव योजना

—ठेवीची अनेक आवर्तने करा

**किमान रुपये ५/- अगर रुपये ५/- च्या पटीने खाते सुरू करता येते.**



तुम्हीही टी.व्ही. घेऊ शकता।
किंवा छोट्या मोठ्या कौटुंबिक गरजा
महाबँकेच्या आवर्त ठेव योजनेद्वारा
पूर्ण करू शकता. मात्र शिलकी रकमेच गुपित
तुमच्या ह्यांना कळू देऊ नका म्हणजे झालं!

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी:
'लोकमंगल', शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

BAAS/BM/F02/80